## प्रकरण तिसरे

# डॉ. आंबेडकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार

## प्रकरण तिसरे

## डॉ. आंबेडकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार

### १) डॉ. आंबेडकरांचे चरित्र:

दलितांच्या मुक्तीलढयाचे नेते, भारतीय घटनेचे शिल्पकार, विद्वान कायदेपंडित, अर्थशास्त्रज्ञ, कामगार नेते, सक्रिय राजकारणी, ध्येयवादी पत्रकार अशा विविध नात्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिचित आहेत. त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी पार पाडली आहे. थोर विचारवंत, कृतीशील समाजसुधारक, राजकारणी अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व व कर्तृत्व सर्वमान्य झाले आहे. भारताचा महामानव या नात्याने त्यांच्या कार्याचे आजही स्मरण केले जाते.

डॉ. आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ यादिवशी रत्नागिरी जिल्हयातील मंडणगडजवळ असलेल्या आंबवडे या गावी एका अस्पृश्य जातीत झाला.[१] बाबासाहेबांचे आईवडील अत्यंत धार्मिक व सात्त्विक प्रवृत्तीचे होते. त्यांच्या वडिलांनी ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत यासारख्या अनेक धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केला होता. कबीर, रामानंद यांचे दोहे, अभंग म्हणण्याचा त्यांचा परिपाठ होता. अशा आध्यात्मिक व नैतिक वृत्तीचे संस्कार बालवयातच बाबासाहेबांवर झाले. परन्तु त्यांनी धार्मिक विचारांचे कधीही अंधानुकरण केले नाही. त्यांच्या विचारांना तर्कशक्तीची जोड होती. त्यांचे विचार अधिक चिंतनशील, प्रत्यक्षनिष्ठ व अनुभवजन्य असत. जे बुध्दीला पटेल त्याचा ते स्वीकार करीत. अशाप्रकारे त्यांचे व्यक्तिमत्त्व घडण्यास कौटुंबिक परिस्थिती कारणीभूत ठरली.[२]

बाबासाहेबांनी प्राथमिक, माध्यमिक व पदवीपरीक्षेपर्यंतचे शिक्षण सातारा, मुंबई येथे पूर्ण केले.[3] १९१२ साली ते बी.ए. झाले. शालेय धोत असताना आंबेडकरांची प्रगती फारशी समाधानकारक नव्हती. परंतु त्यानंतर त्यांची बुध्दी अधिक प्रगल्भ होत गेली. १९१३ मध्ये बडोध्याचे सरकार सयाजीराव गायकवाड यांच्या सहकार्याने उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेला रवाना झाले. त्यांच्या शिष्यवृत्तीची मुदत १५ जून १९१५ ते १४ जून १९१६ अशी होती.[४] कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र या विषयांचा अभ्यास करण्याचे ठरविले. हेरॉल्ड रस्की, किंग्स्ले मार्टिन, एडविन कॅनन, सिडने वेब यांनी त्यांच्या विद्वत्तेची प्रशंसा केली.

अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी ते पुन्हा इंग्लंडला गेले. या काळात त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर संशोधन व लेखन केले. १९२३ साली लंडन विद्यापीठाने अर्थशास्त्रातील त्यांच्या 'The Problems of Rupee' या प्रबंधाबद्दल "डॉक्टर ऑफ सायन्स" ही पदवी दिली. तर Administration and Finance of The East India Company या विषयावर एम्.ए. चा प्रबंध त्यांनी १५ मे १९१५ रोजी सादर केला.[5] एम्.ए.ची पदवी मिळाल्यानंतर १९१६ साली त्यांनी कोलंबिया विद्यापीठात भारताच्या राष्ट्रीय नफ्यातील वाटयाविषयी चिकित्सक दृष्टीने अभ्यास सुरु केला. या विषयावर सादर केलेल्या 'The Evolution of Provincial Finance in British India' या प्रबंधाला पीएच्.डी. ही पदवी मिळाली.

भारतात परत आल्यानंतर त्यांनी वकिलीच्या व्यवसायाला सुरुवात केली. त्यानंतर काही काळ सरकारी विधी महाविद्यालयात प्रथम प्राध्यापक

नंतर प्राचार्य म्हणून काम पाहिले. याच काळात ते सामाजिक कार्यातही भाग घेऊ लागले. बालवयातच बाबासाहेबांना अस्पृश्यतेमुळे मिळणाऱ्या अन्यायकारक वागणूकीची जाणीव झाली होती. त्यामुळे विषम हिंदू समाजरचनेविरुद्ध लढा देण्याचा त्यांनी निर्धार केला. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, छ. शाहू महाराज, यांचे प्रोत्साहन त्यांना मिळाले. त्यांच्या एकंदर कार्यावर व विचारांवर या सर्वांचा प्रभाव होता. परंतु विशेषत: त्यांच्यावर म. फुले यांच्या कार्याची विशेष छाप होती. आंबेडकर म. फुले यांना आपले गुरु मानीत. फुले यांनी सामाजिक समतेसाठी सुरु केलेला लढा त्यांनी पुढे चालविला. हिन्दू धर्मातील तत्त्वांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. विषमतामूलक जाति, वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचे निर्मूलन करणे हे त्यांच्या विचारांचे व कार्याचे मुख्य सूत्र होते. त्यांनी हिन्दू धर्मातील अन्यायकारक रुढी, विषम समाजव्यवस्था यांना आव्हान दिले व दलितांच्या हक्कविषयक चळवळीला एक नविन वळण दिले.

डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेचा शास्त्रीय व बुध्दीवादी दृष्टीकोनातून अभ्यास केला. जातिसंस्थेची घडण, लक्षणे, आधार, उत्पत्ती, तिचे विकृत स्वरुप यांचा समाजहिताच्या व मानवी हक्कांच्यादृष्टीने विचार मांडला. अस्पृश्य वर्गामध्ये जागृती घडवून आणण्यासाठी अनेक कार्यक्रम हाती घेतले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन ब्रिटीश शासनाने १९२३ मध्ये विधी मंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती केली.[६]

डॉ. आंबेडकर ध्येयवादी पत्रकारही होते. वृत्तपत्राच्या क्षेत्रातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. वृत्तपत्र हे लोकजागृतीचे एक प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी ओळखले. राजर्षी शाहू महाराजांच्या मदतीने

३१ जानेवारी १९२० रोजी त्यांनी "मूकनायक" हे पाक्षिक सुरु केले.[७] त्यानंतर महाड धर्मसंगराच्या निमित्ताने त्यांनी "बहिष्कृत भारत" हे पाक्षिक सुरु केले. तसेच २९ जून १९२८ मध्ये "समता पत्रा", "प्रबुध्द भारत" अशी पाक्षिके काढली. परंतु व्यवस्थापकीय गोंधळ व आर्थिक संकट यामुळे ती सर्व अल्पजीवी ठरली.[८] आंबेडकरांची लेखनशैली वैशिष्टयपूर्ण होती. त्यांचे लेखन तर्कशुध्द, आक्रमक, असे सडेतोड युक्तीवाद हा त्यांच्या लेखनाचा विशेष होता. या विविध पाक्षिकांमधून विशेषतः "बहिष्कृत भारता"तून त्यांनी सामाजिक व आर्थिक विषमतेचे स्वरुप यावर अनेक अग्रलेख व स्फुट लेख लिहिले. हिन्दू समाजाच्या विघटनास कारणीभूत असणाऱ्या जातिप्रथेविरुध्द निर्भिड विचार त्यांनी विविध लेखांमधून मांडले.

त्यांच्या नेतृत्वाच्या, कर्तृत्वाच्या व सामाजिक कार्यांच्यादृष्टीने महाडचा धर्मसंगर ही घटना विशेष महत्त्वाची ठरली. हिन्दू धर्ममतांचा व जीर्णमतवाद्यांचा ढोंगीपणा वेशीवर टांगण्याच्या व अस्पृश्यांचा समान हक्क प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने त्यांनी २० मार्च १९२७ या दिवशी समतेचा लढा पुकारला.[९] डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसह महाडच्या चवदार तळयावर जाऊन दलित वर्गाचा समतेचा हक्क प्रस्थापित केला. परंतु कर्मठ हिन्दूनी तळयाची शुध्दी केल्याची वार्ता ऐकून आंबेडकरांनी पुन्हा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला.[१०] या सत्याग्रहाचा एक भाग म्हणून ज्या मनुस्मृतीने अस्पृश्य जातीवर दास्य व कठोर बंधने लादली. त्या मनुस्मृतीचे दहन २५ डिसेंबर १९२७ रोजी करण्यात आले.

या काळात आंबेडकरांनी केलेल्या लोकहिताच्या कार्याची दखल ब्रिटीश शासनाने घेतली व त्यांची १९२७ मध्ये मुंबई विधीमंडळावर नियुक्ती केली. १९३२ मध्ये पुन्हा त्यांची फेरनिवड झाली. तर १९३७ च्या

निवडणूकीत विजयी होऊन ते विधीमंडळाचे सदस्य बनले. याकाळात त्यांनी केलेले कार्य बहुविध स्वरूपाचे आहे. १९२७ चा महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, १९२९ मध्ये काळाराम मंदिर प्रवेशासाठी केलेला सत्याग्रह वृत्तपत्रीय कार्य, दलित चळवळीचे नेतृत्व अशा विविध घटनांनी त्यांचे सार्वजनिक जीवन व्यापले होते.

त्यानंतरच्या कालखंडात म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्ष व पुणे करार या घटना विशेष महत्त्वाच्या ठरल्या. अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासाठी त्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळावेत अशी आंबेडकरांची मागणी होती तर म. गांधींचा या मागणीला पूर्णत: विरोध होता. शेवटी १७ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटीश प्रंतप्रधानांनी "जातीय निवाडा" जाहिर केला.

जातीय निवाडयाप्रमाणे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देऊ नयेत व त्यांनी आपला प्रतिनिधी साधारण मतदार संघातून निवडावा, अशी मागणी गांधींनी केली. त्यांना जातीय निवाडा मान्य नव्हता. अन्यथा या मागणीसाठी २० सप्टेंबर १९३२ पासून आमरण उपोषण करण्याचा त्यांनी निर्णयही घेतला. या निर्णयामुळे डॉ. आंबेडकरांसमोर म.गांधींचे प्राण की अस्पृश्य वर्गाचे हक्क हा प्रश्न निर्माण झाला. अखेरीस या पेचातून समेट घडून आला व तोच "पुणे करार" या नावाने प्रसिध्दीस आला.[११] पुणे करारानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळण्याची संधी गेली. परंतु त्यांना राखीव जागा मिळाल्या. तसेच संयुक्त मतदार संघामुळे बहु-संख्य स्पृश्य वर्गाला हवा असलेला अस्पृश्य उमेदवार निवडणे शक्य झाले. या सर्व प्रकरणात आंबेडकरांनी अत्यंत खंबीरपणा, संयम व तत्त्वनिष्ठा दाखविली.

गोलमेज परिषद, पुणे करार, यामुळे डॉ. आंबेडकरांचे नाव दलितांचे

नेते म्हणून ओळखले जाऊ लागले. १९३६ मध्ये त्यांनी "स्वतंत्र मजूर पक्षाची तर १९४२ मध्ये "ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन"ची स्थापना केली.[१२] या पक्षातर्फे १९४२ ते १९४६ याकाळात अस्पृश्यांकरिता अनेक लढे दिले. त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न केले. त्यासाठी "पीपल्स एज्युकेशन सोसायटी"ची व मुंबई येथे सिध्दार्थ कॉलेजची स्थापना केली.[१३]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्रिय कायदे मंडळात कायदामंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली. राज्यघटना तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या घटना समितीचे ते सदस्य होते. तर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांना नियुक्त केले गेले. अस्पृश्यता निवारण करणारा भारतीय राज्यघटनेतील ११ वा अनुच्छेद ही डॉ. आंबेडकरांची अत्यंत महत्त्वाची कामगिरी आहे.

डॉ. आंबेडकरांनी निरपेक्ष हेतूने आपल्या जातिबांधवांसाठी व देशासाठी कार्य केले. हिन्दू धर्मतत्त्वांमध्ये व सनातनी हिन्दूंच्या कर्मठ वृत्तीत बदल होईल या विचाराने त्यांनी अन्याय व विषमता याविरुध्द अखंड लढा दिला. परंतु हिन्दू धर्म अस्पृश्यांना माणूसकीचेही अधिकार देणार नाही व हिन्दू धर्मात राहून त्यांना आपली प्रगती करता येणार नाही. असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला अर्थात फार पूर्वी म्हणजे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी त्यांनी येवले येथे धर्मान्तराची घोषणा केली होती. तसेच १९२७ मध्येही धर्मान्तराचे सूतोवाच केले होते.

अखेरीस १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी हिन्दू धर्माचा त्याग करून बौध्द धर्माचा स्वीकार केला.[१४]

आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांनी बौध्द धर्माच्या प्रसाराचे

कार्य हाती घेतले. अनेक सभा, परिषदांमधून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. परंतु अनेक व्याधींनी ग्रासलेले व अखंड श्रमाने थकलेले त्यांचे शरीर क्षीण होऊ लागले. अखंड परिश्रमामुळे व स्वत:कडे दुर्लक्ष झाल्यामुळे दि ६ डिसेंबर १९५६ यादिवशी त्यांचे निर्वाण झाले. एका अर्थाने डॉ. आंबेडकरांचे जीवन म्हणजे एक अखंड संघर्ष होता. प्रस्थापित हिन्दू समाजरचना, परंपरावादी सवर्ण हिन्दू, ब्रिटीश सत्ता, न्यूनगंडाने ग्रासलेला अस्पृश्य वर्ग यासर्वांविरुद्ध त्यांनी शेवटपर्यंत लढा दिला. या संघर्षांतून त्यांनी दलितांना त्यांचे हक्क, आत्मबल व जगण्यासाठी नवी शक्ती मिळवून दिली.

डॉ. आंबेडकरांनी हिंदु जातिसंस्थेच्या संदर्भात अत्यंत मूलगामी असे विचार मांडले होते. त्यांच्या मते भारताच्यास सर्वांगिण ऱ्हासास येथील जातिव्यवस्था कारण होती.

## आंबेडकरांच्या मते हिन्दू समाजाच्या ऱ्हासाची कारणे:

डॉ. आंबेडकरांनी अनेक प्रसंगी मेळावे परिषदा, संमलने याद्वारे हिन्दू समाजाच्या तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात विचार मांडले आहेत. अनेक भाषणांमधून, वृत्तपत्रांमधील लेखांमधून त्यांनी या विषयावर चर्चा केली आहे. या सर्वांतून त्यांनी हिन्दू समाजाच्या ऱ्हासाला कारणीभूत असलेल्या रुढी व प्रथा-परंपरांचा परामर्श घेतला आहे. त्यांच्या मते, जातिप्रथा हा हिन्दू समाजाचा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यासाठी जाति-प्रथेचे निर्मूलन केले पाहिजे. जातिप्रथेमुळे समाजाचा सामाजिक, भौतिक, नैतिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्टीने ऱ्हास झाला आहे. डॉ.आंबेडकरांच्या मते, व्यक्तीजीवन, समाज जीवन व राष्ट्रजीवन या सर्वांवर जातिसंस्थेचा घातक परिणाम झाला आहे. म्हणून जातिभेदाच्या प्रथेला ते व्यक्तिगत तसेच

सामाजिक समस्या मानतात.

डॉ. आंबेडकरांच्या मते जातिप्रथेमुळे समाजाची कर्तृत्वशक्ती नष्ट झाली. तिने समाजाच्या कार्यशक्तीला निर्बल व पंगू केले. जातिप्रथा ही केवळ सर्वच दृष्टीने अयोग्य व अन्यायकारक प्रथा आहे असे नाही तर त्याचबरोबर ती हिन्दू समाजव्यवस्थेस घातकही आहे. कारण जाति-प्रथेने आजपर्यंत एकच गोष्ट निश्चितपणे केली आहे आणि ती म्हणजे हिन्दू समाजाचे पूर्णतः विघटन आणि नैतिक अधःपतन होय.[१५] अशा हिन्दू समाजाला "समाज" ही संज्ञा देता येणार नाही. कारण ते असंख्य जातींचे मिळून बनलेले एक मिश्रण आहे. अशा समाजातील प्रत्येक जात स्वतःला दुसऱ्या जातिपेक्षा श्रेष्ठ समजते. जातिजातीत संकुचित जात्यभिमानाच्या कल्पना आढळून येतात. एका जातीला दुसऱ्या जातिविषयी आपुलकीची भावना नाही. प्रत्येक जातीत फक्त स्वहिताची भावना प्रकर्षाने आढळते. या अतिरेकी जात्यभिमानामुळे व संकुचित स्वहिताच्या भावनेमुळे हिन्दूमध्ये राष्ट्रीय एकात्मता किंवा संघटन होणे अशक्य झाले आहे.[१६] म्हणून ते म्हणतात की "जोपर्यंत जात आहे तोपर्यंत संघटन शक्य नाही आणि जोपर्यंत संघटन नाही तोपर्यंत हिन्दू दुबळा व लाचार राहणार."[१७]

जातिव्यवस्थेचे घातक परिणाम हिन्दूंच्या नीतिमत्तेवरही झाले आहेत. तिने समाजाची सामाजिकतेची जाणीव, भूतदया, सद्गुण, नीती, दातृत्व अशा भावनांचा नाश केला आहे.[१८] जातिंमुळे शुध्दीची चळवळ फोल ठरते. कारण परधर्मात गेलेल्या हिन्दूला शुध्द करुन घेतले तरी त्यांची जात त्यांचा स्वीकार करीत नाही. म्हणूनच जातिव्यवस्थेत अस्तित्वात असणारी अत्यंत घातक रुढी म्हणजे जातिबहिष्काराची होय. जातिनियमांचे उल्लंघन करणाऱ्या हिन्दूला जातिबहिष्कृत केले जाते. जातिबहिष्काराने सामाजिक सहजीवन नष्ट होते. अशा जातिबहिष्कृत हिन्दूंना अहिंदूंनी आपल्या धर्मात

घेतल्यामुळे हिन्दू समाजाचा शक्तिपात होत आहे. तो दुर्बल बनत आहे. यादृष्टीने जातिबहिष्काराची प्रथा हा सामाजिक ऐक्याच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे.[१९]

सांस्कृतिक ऐक्याच्या दृष्टीने देशातील जातिसंस्था घातक आहेत. सर्व हिन्दू संस्कृतीच्यादृष्टीने एक असले तरी ते जात्यभिमानी आहेत. त्यांच्यात ऐक्य, सहकार्य आढळत नाही. त्यामुळे हिन्दू समाज एकसंघ बनू शकत नाही. संस्कृती या घटकाच्या आधारावर हिन्दूंचे संघटन करणे अशक्य आहे. त्यामुळे जातिव्यवस्था हिन्दूंच्या अखंड पराभवास कारणीभूत झाली आहे. कारण हिन्दू समाज अनेक जातीमध्ये विभागलेला आहे. या अर्थानेही हिन्दूच्या हानीचे मूळ जातिभेदात आहे आणि जात हे हिन्दूंच्या अवनतीचे कारण आहे.

जातिव्यवस्थेचे आर्थिक दुष्परिणामही हिन्दू समाजावर झाले आहेत. जातिप्रथेच्या अतिरिक्त बंधनांमुळे समाजाची आर्थिक क्षमता व कार्यशक्ती यांचा क्षय झाला आहे, कारण जातिसंस्थेच्या सदस्यांवर जन्मजात व्यवसाय लादला जातो. इतर व्यवसाय करण्याची त्याला बंदी असते. व्यवसायबंदीची पध्दत घातक आहे हे स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात की व्यवसाय किंवा उद्योग कधीही स्थिर नसतात. त्यात परिस्थितीनुसार बदल होत असतात. परिस्थिती बदलेल तसा व्यवसाय बदलण्याचा हक्क जातिसंस्थेच्या सभासदांनाअसणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना आपला उदरनिर्वाह करणे शक्य होणार नाही.[२०] प्रत्येक व्यक्तीचे कार्यक्षेत्र जन्मजात व्यवसायापुरते मर्यादित राहिल्यामुळे दारिद्र्य व बेकारीचा राष्ट्र व्यापी प्रश्न निर्माण झाला आहे.

कनिष्ठ जातींना ठराविक व्यवसाय करावे लागतात. त्या व्यवसायांना समाजात प्रतिष्ठा नसते. त्यामुळे असे व्यवसाय करणाऱ्या

लोकांना आपल्या व्यवसायाविषयी आवड निर्माण होत नाही. त्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. तसेच जातिव्यवस्थेतील श्रमविभाजन ऐच्छिक नसल्यामुळे कार्यक्षमता कमी होते. म्हणून डॉ.आंबेडकर म्हणतात की "आर्थिक संघटन यादृष्टीनेदेखील जातिव्यवस्था अतिशय हानिकारक आहे."[२१]

आंबेडकरांच्या मते, सामाजिक सुधारणा प्रगती यादृष्टीनेदेखील जातिसंस्था हानिकारक आहे. ते म्हणतात, "जात" हे सर्वसुधारणा दडपण्याचे व नष्ट करण्याचे एक फार मोठे अस्त्र आहे."[२२] म्हणून जोपर्यंत जातिप्रथा अस्तित्वात आहे तोपर्यंत हिन्दू समाजात सुधारणा घडून येणार नाही. कारण जाती आपला स्वार्थ पाहतात. स्वहिताचा व स्वउध्दाराचा विचार करतात. अनेक वेळा जातीच्या हिताकरता देशाच्या हिताचा बळी दिला जातो.

डॉ. आंबेडकर म्हणतात, भारतीय समाज व्यवस्थेत न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सहजीवन या तत्त्वांचा अभाव आढळतो. हिन्दूंची जीवनपध्दती या तत्त्वांवर आधारलेली नाही, असे आढळते.[२३] त्यामुळे हिन्दू समाजात कधी ऐक्य निर्माण होऊ शकत नाही. तो सतत विघटीत व दुर्बल राहिला आहे.

हिन्दू समाजाच्या ऱ्हासाची डॉ. आंबेडकरांनी केलेली मीमांसा अभ्यासपूर्ण आहे. त्यांनी जातिप्रथेचे स्वरूप, तिची भूमिका, जातिबंधाने यासर्वांची हिन्दू समाजाचे ऐक्य व संघटन यादृष्टीने चिकित्सा केली व हजारो वर्षांपासून जातिप्रथेने हिन्दू समाजाचा ऱ्हास कसा चालविला आहे याची मीमांसा केली.

## जातिसंस्थेचे टीकात्मक परिक्षण:

डॉ. आंबेडकरांचा जातिव्यवस्थेचा अभ्यास अत्यंत सखोल होता. त्यांनी शास्त्रीय व बुध्दीवादी दृष्टीने जातिव्यवस्थेची मीमांसा केली आहे. जातिसंस्थेची निर्मिती, स्वरुप, तिचे आधार व लक्षणे, दुष्परिणाम याविषयीचे त्यांचे विचार अत्यंत अभ्यासपूर्ण आहेत. भारतातील जातिजीवनाचा सूक्ष्म अभ्यास करुन त्यांनी हे विचार मांडले. स्वत:चे विचार मांडण्यापूर्वी त्यांनी पूर्वीचे संशोधन, अभ्यास व मांडण्यात आलेले मुद्दे तपासून पाहिले त्यातील काही मुद्दयांचे खंडन करुन अभ्यासाअंती तर्कसंगत असे नवीन मुद्दे मांडले.

९ मे १९१६ रोजी कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळासमोर "भारतातील जाती-त्यांची घडण, उत्पत्ती व प्रसार" या विषयावर डॉ. आंबेडकरांनी निबंध वाचला. हा निबंध म्हणजे भारतातील जातिसंस्थेचे टीकात्मक परिक्षण आहे. या निबंधात त्यांनी जातिसमस्येचाही व्यापक दृष्टीने विचार मांडला आहे.

भारतातील जातिसंस्थेच्या उत्पत्तीसंबंधी पूर्वी मांडण्यात आलेल्या विचारांचा अभ्यास करुन त्यांनी स्वतंत्रपणे आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, "व्यवहारश: व तत्वश: अशा दोन्ही दृष्टीने जातिची समस्या अतिशय व्यापक आहे"[२४] तसेच ती एक प्रादेशिक समस्या आहे. हिन्दू समाज असंख्य जातीत विभागलेला आहे. म्हणूनच हिन्दू समाजाची रचना संमिश्र आहे, असे म्हटले जाते. परंतु आंबेडकरांच्या मते, हजारो जाती-उपजाती मिळून तयार झालेल्या भारतीय समाजव्यवस्थेत आश्चर्यकारक सांस्कृतिक ऐक्य आढळून येते. "भारत केवळ भौगोलिकदृष्टयाच एक आहे असे नव्हे तर एकतेच्या इतर कोणत्याही गमकापेक्षा भारतात अधिक मूलभूत असलेली सांस्कृतिक एकता एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आढळून येते."[२५]

या अर्थाने जातिसंस्था हे भारतीय समाजव्यवस्थेचे एक मूलभूत वैशिष्ट्य आहे. भारतीय समाज वेगवेगळ्या जातींचा मिळून बनलेला असला तरी या सर्व जाती परस्परावलंबी आणि परस्पर संबंधी आहेत, हे त्यांनी या निबंधात स्पष्ट केले. ते लिहितात, "प्रत्येक जात ही जातींच्या साखळीतील एक दुवा असून तिचा दुसऱ्या जातीशी एक निश्चित प्रकारचा संबंध असतो. सर्व जाती मिळून एक स्वयंपूर्ण जातिसंस्था निर्माण होते."[२६] म्हणजेच त्यांच्या मते, प्रत्येक जात ही संपूर्ण जातिसंस्थेची एक अविभाज्य व अनिवार्य घटक असते. कोणतीही जात पूर्णपणे स्वतंत्र व एकाकी नाही.

आंबेडकरांच्या मते, जरी जाति-जातिंची मिळून स्वयंपूर्ण जातिसंस्था निर्माण होत असली तरी जात ही एक बंदिस्त संस्था आहे. कारण जातीच्या सभासदांवर सामाजिक व्यवहाराच्यादृष्टीने अनेक मर्यादा पडतात. अशा अर्थाने "जात ही एक स्वयंमर्यादित संस्था असल्यामुळे स्वभावत:च तिच्या सभासदांवर भोजनादि सामाजिक व्यवहार अंतर्गतच करण्याची मर्यादा पडते."[२७] थोडक्यात रोटीबंदी, बेटीबंदी, व्यवसायबंदी अशा बंदिस्त व्यवहाराला स्वयंमर्यादित जातिसंस्था नैसर्गिकपणे जबाबदार आहे. म्हणजे ही जातिबाह्य भोजनबंदी मुद्दाम लादलेली नसून ती जातीच्या स्वभावधर्माचा एक परिणाम आहे. या स्वाभाविक प्रवृत्तीतून जातिबाह्य रोटीबंदी निर्माण झाली व तिला धार्मिक आज्ञेचे स्वरूप प्राप्त झाले असावे असा तर्क आंबेडकरांनी केला आहे.

जातिबाह्य रोटीबंदीप्रमाणे जात्यंतर्गत विवाहाची रूढी हे जातीचे व्यवच्छेदक लक्षण ठरते आणि जातिबाह्य विवाहबंदीची प्रथा हाच जातीचा खरा आत्मा आहे.[२८] कारण त्यांच्यामते, जातिबाह्य रोटीबंदी व विवाहबंदी या दोन प्रथांमुळेच जात ही स्वयंमर्यादित संस्था बनली आहे व तिचे बंदिस्त स्वरूप हजारो वर्षे टिकून राहिले आहे.

या निबंधात जातिसंस्थेचे स्वरूप स्पष्ट करताना आंबेडकर लिहितात, जात ही एक स्वयंमर्यादित संस्था आहे. त्याच प्रमाणे तो एक स्वयंमर्यादित वर्ग आहे.[२९] समाजात अनेक प्रकारचे वर्ग असतात. समाज हा नेहमीच विविध वर्गांच्या समावेशाने तयार होतो आणि व्यक्तीही नेहमीच कोणात्या ना कोणत्या वर्गाची सभासद असते. हिन्दू समाजाचे विभाजन पूर्वीपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्गात झालेले आढळून येते. आंबेडकरांच्या मते, याचार वर्गापैकी ब्राह्मण वर्गाने जातिसंस्था निर्माण केली. हा वर्ग स्वत:ला उच्च व श्रेष्ठ समजत असे. त्यामुळे या वर्गाने सर्वप्रथम स्वत:ला सर्वात वरच्या वर्गात बंदिस्त केले. या वर्गाने प्रथम आपल्या वर्गापुरती बेटीबंदीची मर्यादा घालून घेतली. त्याचे अनुकरण कनिष्ठ जातींनी केले. अशाप्रकारे ब्राह्मण वर्गाच्या अनुकरणातून आपोआप बंदिस्त अशी चातुर्वर्ण्य पध्दती निर्माण झाली. म्हणून आंबेडकर म्हणतात की ह्या-या अर्थाने ब्राह्मण वर्ग या कृत्रिम जातिसंस्थेचा जनक आहे.[30]

वरील मुद्दा मांडताना त्यांनी जातिसंस्थेच्या निर्मितीसंबंधी मांडण्यात आलेले सुरूवातीचे मुद्दे व सिध्दान्त अमान्य केले. म्हणून श्रुति-स्मृति, पुराणे यांनी श्रमविभागणीच्या नावाखाली जातिप्रथा, गरीब, हीन व दुर्बल वर्गावर लादली हा जातिसंस्थेच्या निर्मितीसंबंधीचा पारंपरिक विचार त्यांनी अमान्य केला. या संदर्भात ते म्हणतात, "जातीचा कायदा कोणी तरी तयार केला ही कल्पनाच करता येण्यासारखी नाही."[३१] याचे स्पष्टीकरण ते असे करतात की कुणाच्या तरी आज्ञेवरून किंवा कुणी-तरी केलेल्या कायद्याच्या आज्ञेवरून एकाच वेळी आपली स्थिती जनावरांच्या बरोबरीने नीच करून घेण्यास व त्याच वेळी दुस-या वर्गास सर्वोच्च अधिकार व हक्क देण्यास समाजातील कोणताही वर्ग तयार होणे शक्य नाही.

भारतीय जातिसंस्थेचे परीक्षण करताना त्यांनी टीकात्मक दृष्टीने असा मुद्दा मांडला आहे की, जातिसंस्थेची निर्मिती मनूच्या काळात झालेली नाही. तसेच मनू जातिसंस्थेचा निर्माताही नाही. तर ती मनूच्या फार पूर्वी अस्तित्वात आली असावी आणि मनू हा जातिसंस्थेचा एक प्रचारक होता. त्याने फक्त तिच्या रचनेला तात्त्विक स्वरूप दिले.[३२] डॉ. आंबेडकरांच्या मते, फार प्राचीन काळात परिस्थितीनुसार जातिसंस्था स्वाभाविकपणे निर्माण झाली असावी. ती ब्राम्हणवर्गाने किंवा शास्त्र-पुराणांनी जाणीवपूर्वक किंवा स्वार्थासाठी निर्माण केलेली नाही. त्यामुळे जातिसंस्था मनूने निर्माण केली किंवा ती त्याच्याकाळात जातिसंस्था निर्माण झाली, असेही निश्चितपणे म्हणता येणार नाही.

इतिहासाच्या विशिष्ट कालखंडात जातिसंस्था अकस्मितपणे निर्माण झाली असावी, असेही डॉ. आंबेडकरांना वाटत नाही. जातिसंस्थेच्या निर्मितीविषयी असा समज रूढ आहे की हिन्दू समाजव्यवस्था जातीच्या चौकटीत मोठया चातुर्याने बसविलेली असून शास्त्रांनी जाणीवपूर्वक निर्माण केलेली ती एक संस्था आहे. ती शास्त्रांनी निर्माण केलेली असल्यामुळे चांगली असणार. कारण शास्त्रे चूक असू शकत नाहीत. या समजाचे खंडन करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, की जातिसंस्थेची निर्मिती हे शास्त्रपुराणांचे कसब व चातुर्य नाही तर तिचे मूळ वर्ग व्यवस्थेत आहे. जगात सर्वत्र वर्गव्यवस्था आढळते. भारतीय समाजही त्याला अपवाद नाही. जगातील इतर समाजाप्रमाणे भारतीय समाजही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा चार वर्गात विभागलेला होता. परंतु सुरुवातीच्या काळात ही वर्गव्यवस्था लवचिक किंवा शिथिल होती. कनिष्ठ वर्गाचे सभासद वरिष्ठ वर्गात तसेच वरीष्ठ वर्गाचे सभासद कनिष्ठवर्गात प्रवेश करू शकत. एका वर्गातून दुसऱ्या वर्गात प्रवेश करण्यास कोणत्याही सभासदाला प्रवेशबंदी नव्हती.

परंतु काळाच्या ओघात ब्राम्हण वर्गाने इतर तीन वर्गाशी असलेले सामाजिक संबंध व व्यवहार मर्यादित करुन प्रवेशबंदीच्या मार्गाने स्वत:चे बंदिस्त वर्गात रुपांतर करुन घेतले. परिणामी या बंदिस्त ब्राम्हण वर्गाचे "स्वयंमर्यादित जातीत रुपांतर झाले. त्यानंतरच्या काळात इतरही कनिष्ठ वर्गानी स्वेच्छेने किंवा अनिच्छेने श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार निर्माण झालेली बंदिस्त जातिसंस्थेची कल्पना मान्य करुन तिचा स्वीकार केला.[33] अशा प्रकारे ब्राम्हण वर्ग जातिसंस्थेचा निर्माता ठरला. जातिसंस्थेच्या निर्मितीची प्रक्रिया पूर्णत: स्वाभाविक व अनुकरणातून घडलेली आहे ती कोणाच्याही उपदेशाने किंवा आज्ञेने घडून आलेली नाही.[34] थोडक्यात मनूने किंवा शास्त्रवचनामुळे जातीची निर्मिती झाली हा जातिव्यवस्थेच्या निर्मितीसंबंधीचा पारंपरिक विचार त्यांनी वरील स्पष्टीकरण देऊन नाकारला आहे.

वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्थेची निर्मिती झाली, असे आंबेडकर मानतात. प्राचीन काळातअस्तित्वात असलेल्या लवचिक वर्णव्यवस्थेतून स्वाभाविकपणे जातिसंस्था निर्माण झाली. असे सांगून ते म्हणतात, जोपर्यंत वर्णव्यवस्था लवचिक होती तोपर्यंतती आदर्श होती. परंतु कालांतराने मूळच्या लवचिक वर्णपध्दतीत एक अस्वाभाविक रुढी निर्माण झाली. ती म्हणजे या व्यवस्थेने वर्णावर्णातील मुक्त प्रवेशाची पध्दत गमावली व ते स्वयंमर्यादित वर्ग बनले.[35] त्यांचे रुपांतर बंदिस्त वर्णपध्दतीत झाले. त्यांनाच "जाती" म्हणतात.

उच्च वर्गानी सर्वप्रथम प्रवेशबंदीच्या मार्गाने बंदिस्त जातिप्रथा स्वीकारली. त्यामुळे ते म्हणतात, "काहींनी दारे स्वत: बंद केली तर इतरांना त्याच्यासाठी दारे बंद असल्याचे आढळून आले."[36]

या स्वयंमर्यादित वर्गांनी कालांतराने जात्यंतर्गत विवाहाची पध्दत स्वीकारली. या वर्गाला सुरुवात ब्राम्हण वर्गापासून झाली, असे आंबेडकर म्हणतात. तिचे अनुकरण हळूहळू सर्व वर्गांनी केले व त्यांचेही रुपांतर जात्यंतर्गत विवाहाची रुढी पाळणाऱ्या जातीत झाले.

अशाप्रकारे जात्यंतर्गत विवाह व जातिबाह्य रोटीबंदीच्या रुढींचे पालन वर्षानुवर्षे जातिंकडून केले गेले. त्यामुळे या रुढींचा खोलवर परिणाम हिन्दूंच्या मनावर झाला. परिणामी आज जातिव्यवस्था व जातिप्रथा कोणत्याही आधारावाचून हिन्दूंच्या मनात लोंबकळत राहिल्या आहेत.[३७]

जातिव्यवस्थेची उत्पत्ती घडण व प्रसार या विषयाचे व त्याआधारे केलेल्या विवेचनाचे सार स्वाचे चार मुद्दे डॉ. आंबेडकरांनी या निबंधाच्या शेवटी मांडले आहेत. ते असे —

१) हिन्दु समाजाची रचना संयुक्त स्वरुपाची असली तरी तेथे आश्चर्यकारक असे सांस्कृतिक ऐक्य आढळते.

२) "जात"म्हणजे एका मोठया सांस्कृतिक ऐक्य असलेल्या समाजाचा छोटा असा अंशात्मक तुकडा किंवा भाग आहे.

३) एका जातीने इतर जातिंची निर्मिती केली आहे.

४) अनुकरणाच्या व बहिष्काराच्या माध्यमाद्वारे पूर्वीच्या स्वयंमर्यादित वर्गाचे रुपांतर बंदिस्त अशा जातित झाले आहे.[३८]

भारतामध्ये जातिसंस्था कशी निर्माण झाली तिचा विकास व स्वरुप कसे होते याचे विवेचन आंबेडकरांनी विविध मुद्यांच्या आधारे केले आहे. तसेच या जातिसंस्थेचे हिन्दू समाजावरील दुष्परिणाम त्यांनी स्पष्ट केले आहेत. त्यांच्यामते, जगात मानवी समाज कुठेही एकसंघ किंवा एकात्म नसून तो अनेकविध स्वरुपाचा आहे. त्यामध्ये भेदाभेद आढळून येतो. तो वर्गावर्गांचा मिळून बनलेला आहे. त्यामुळे जातिप्रथा केवळ हिन्दू समाजातच आढळते असे नाही. परंतु इतर धर्मातील जाती व वर्गभेद

आणि हिन्दू धर्मातील जातिभेद यात मूलत: फरक आहे, असे डॉ. आंबेडकरांना वाटते. याचे प्रमुख कारण म्हणजे "हिन्दूंना एकत्र जोडणारा त्यांना बंधुभावाच्या भावनेने जखडणारा दुवा हिन्दू समाजात नाहीच."[३९] हिन्दू समाजाची जातिनिष्ठ रचनाच त्याच्या विघटनाला कारणीभूत ठरली आहे आणि अशा विघटीत करणाऱ्या शक्ती संघटित करणाऱ्या शक्तीपेक्षा प्रबळ आहेत आणि "जातीमुळे निर्माण होणाऱ्या विघटनाला थोपविणारी अथवा एकात्मता निर्माण करणारी शक्ती हिन्दू समाजात नाही."[४०] याअर्थाने इतर धर्मातील जातिभेद व हिन्दु धर्मातील जातिभेद मूलत: भिन्न आहे. हिन्दूप्रमाणे अहिन्दू समाजात जरी जाती आहेत तरी हिन्दू समाजात जातिभेदास जे सामाजिक वैशिष्टय प्राप्त झाले आहे ते इतर समाजात आढळत नाही.[४१]

अहिंदू समाजामध्ये जातिव्यवस्थेस धर्माचे अधिष्ठान नाही. ती पवित्र व धार्मिक आज्ञेप्रमाणे प्रमाण मानली जात नाही. तर ती रूढी, परंपरा या स्वरूपात आढळून येते. तसेच ती समाजाबरोबर विकसित झालेली आहे. मात्र हिन्दूच्या जातिसंस्थेला धर्माचे अधिष्ठान आहे. जातिप्रथा पवित्र मानली जात असल्यामुळे ती पाळणे सर्वांवर बंधनकारक आहे. त्यांचे उल्लंघन केल्यास व्यक्तीला जातिबहिष्कृत केले जाते.[४२] त्यामुळे हिन्दू समाजाची शक्ती क्षीण झाली आहे. कारण हिन्दू समाजात जातिय भावना सामाजिक ऐक्याच्या भावनेपेक्षा श्रेष्ठ मानली जाते व सामाजिक ऐक्याची भावना निकृष्ट मानली जाते. याबाजूने विचार केला तर जातिप्रथेने हिन्दूचे सामाजिक जीवन विकृत व निकृष्ट बनविले आहे.

अशा विकृत जातिव्यवस्थेला दोन बाजू आहेत –
१) ती लोकांना विभिन्न जमातीत विभागते व २) या जमातींना एकीहून दुसरी श्रेष्ठ अशा क्रमाने त्यांना सामाजिक स्थान देते. या जातींच्या

उतरंडीमध्ये प्रत्येक जात आपण दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ आहोत असा जातिभिमान बाळगते. सामाजिक स्तर रचनेत जात जितकी श्रेष्ठ तितके तिला अधिकार जास्त. जातींची श्रेणीबध्द रचना व जात्यंहंकार यामुळे सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया मर्यादित राहिली.

आंबेडकरांच्या मते, अशा या विकृत जातिव्यवस्थेचे सर्वजण गुलाम आहेत. परंतु या गुलामांचा दर्जा समान नाही.[४३] म्हणूनच जातीचा उच्छेद करायचा झाल्यास काही जातींना इतर जातींपेक्षा अधिकार व आपले सामाजिक स्थान गमवावे लागेल. त्याला उच्च जातींकडून विरोध होईल. त्या सहजासहजी आपले स्थान व अधिकार गमावण्यास तयार होणार नाहीत. त्यामुळे जातिव्यवस्थेचा उच्छेद करण्यासाठी हिन्दू समाजाचे सार्वत्रिक संघटन करणे अवघड आहे, असे त्यांना वाटते.

## डॉ. आंबेडकर यांचे जातिप्रथानिर्मूलनाविषयीचे विचार:

डॉ. आंबेडकर यांनी जातिप्रथा अनिष्ट कशी आहे, तिने अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गाचे शोषण अनेक वर्षांपासून कसे चालविले आहे आणि या जातिप्रथेमुळे हिन्दू समाजाचा सर्वच बाजूंनी ऱ्हास कसा होत आहे याचे विवेचन "जातिप्रथेचे निर्मूलन"(**Annihilation of Caste**) या प्रबंधात सविस्तरपणे केलेले आहे. अर्थात १९३६ साली "जातपात तोडक मंडळासाठी लिहिलेल्या अध्यक्षीय भाषणाचा "जातिप्रथेचे निर्मुलन" हा मराठी अनुवाद पुस्तकरूपाने प्रसिध्द झाला आहे. जातिप्रथेचे अन्याय व विषमता हे दोन प्रमुख आधार असून समाजातील उच्च वर्गाकडून कनिष्ठ वर्गावर सातत्याने अन्याय होत आहे. अशा अन्यायकारक व विषमतामूलक जातिप्रथेच्या निर्मितीला व अस्तित्वाला एक विशिष्ट मनोवृत्ती जबाबदार आहे. हे त्यांनी अत्यंत शास्त्रीय व बुध्दीवादी विचार प्रतिपादन पध्दतीच्या

आधारे या प्रबंधात विस्ताराने स्पष्ट केले आहे. जातिसंस्थेची निर्मिती तिचे स्वरूप, आणि प्रसार याविषयीचे विचार या प्रबंधाच्या पूर्वार्धात त्यांनी मांडले आहेत. तर जातिप्रथेच्या निर्मूलनाची आवश्यकता, त्यावरील उपाय, त्यांचे महत्त्व या मुद्यांची चर्चा प्रबंधाच्या उत्तरार्धात सविस्तरपणे केलेली आहे.

जातिप्रथेचे स्वरूप व तिचे परिणाम स्पष्ट करणे इतक्या मर्यादित उद्देशाने त्यांनी हा प्रबंध लिहिलेला नाही. तर सद्यस्थितीत जातिप्रथा निर्मूलन कोणत्या मार्गांनी करता येईल, त्यादृष्टीने कोणते प्रयत्न करता येतील या मुद्यांवर त्यांनी विशेष भर दिला आहे. प्रबंधाच्या पूर्वार्धात जातिप्रथा अनिष्ट आहे. तिने अस्पृश्यांना अन्यायकारक वागणूक देऊन त्यांना सर्वप्रकारच्या हक्कापासून दूर ठेवले आहे, असे विचार मांडले आहेत. अशा विषम समाजरचनेचे समर्थन हिन्दू धर्मशास्त्रांकडून व धर्म ग्रंथांकडून केले जाते. हजारो वर्षे कनिष्ठ वर्गाला सामाजिक गुलामगिरीत जखडून ठेवणाऱ्या हिन्दू धर्माला व धर्मग्रंथांना त्यांनी वेळोवेळी विरोध केला आहे. डॉ. आंबेडकरांनी केवळ हिन्दू धर्मावर, समाजरचनेवर टीका करण्याच्या उद्देशाने हा प्रबंध लिहिलेला नाही. तर त्यात काही विधायक व समतेच्या तत्त्वावर आधिष्ठीत असे नवे बदल करण्याच्या हेतूने व आदर्श समाजरचनेची कल्पना मांडण्याच्या हेतूने त्यांनी हा प्रबंध लिहीला आहे.

आदर्श समाजरचनेची कल्पना सांगण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी विविध विचारवंतांनी व समाज सुधारकांनी सांगितलेल्या काही पर्यायी समाज व्यवस्थेच्या कल्पनांचे परीक्षण केले आहे. सर्वप्रथम त्यांनी आर्य समाजी सुधारकांनी सुचविलेल्या चातुर्वर्ण्यप्रणीत समाजरचनेचा परामर्श घेतला आहे. आर्य समाजी सुधारकांच्या मते, हिन्दू समाजाची रचना कर्माधिष्ठीत वर्णाश्रमधर्मानुसार केली जावी. यात जन्मनिष्ठ वर्णपध्दतीला स्थान नाही

आणि या व्यवस्थेत जन्मनिष्ठ जातिप्रथा नाकारलेली आहे. परंतु डॉ. आंबेडकरांना समाजरचनेची ही कल्पना मान्य नाही. त्यांच्या मते, अशी समाजरचना प्रत्यक्षात यशस्वी होऊ शकणार नाही. कारण "जोपर्यंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ही नावे अस्तित्त्वात आहेत, तोपर्यंत ही नावे एका विशिष्ट उच्च-नीच भावनेची द्योतक आहेत व ती जन्मजात आहेत, असेच प्रत्येक हिन्दू समजेल व त्याप्रमाणे वागेल."[४४] याशिवाय त्यांच्यामते, कर्मनिष्ठ चातुर्वर्ण्य पध्दती निर्माण करण्यात अनेक व्यावहारीक अडचणी आहेत. म्हणूनच ते म्हणतात, "या चातुर्वर्ण्यप्रणीत समाजरचनेचा सूक्ष्म अभ्यास केला असता ही समाज पध्दती अत्यंत घातक, अव्यवहारी आणि अयशस्वी असल्याची माझी खात्री आहे."[४५] त्यामुळे गुणकर्मावर आधारलेली वर्णव्यवस्था हिन्दू समाजाला लागू करण्याची आर्य समाजी सुधारकांची कल्पना त्यांनी अमान्य केली आहे.

या प्रबंधाच्या उत्तरार्धात डॉ. आंबेडकरांनी जातिप्रथेच्या व्यावहारिक स्वरूपावर व भूमिकेवर विशेष भर दिला आहे. आणि जातिनिष्ठ समाजरचनेला पर्याय म्हणून आदर्श व समताधिष्ठीत अशा समाजरचनेची कल्पना मांडली आहे. या संदर्भात ते म्हणतात, "स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव (विश्वबंधुत्व) या तत्त्वत्रयींवर आधारलेली समाजरचना आदर्श होय."[४६] यादृष्टीने विचार केल्यास डॉ. आंबेडकरांची आदर्श समाजाची कल्पना अत्यंत व्यापक अशा तत्त्वांवर आधारलेली आहे. त्यांना जातिनिष्ठ तसेच गुणकर्मनिष्ठ समाजपध्दती ऐवजी समताधिष्ठीत व लवचिक समाजपध्दती अभिप्रेत होती. ज्या आदर्श समाजव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय या उच्च मूल्यांना महत्त्व असेल, ज्या समाजात व्यक्तीव्यक्तीत कोणत्याही प्रकारचा भेद नसेल, व्यक्तीला समाजाचा घटक या नात्याने आचार, विचार व कृतीचे स्वातंत्र्य असेल, आपल्या सुप्तगुणांचा विकास करण्यास समान संधी

व समान हक्क असेल आणि ज्या समाजात व्यक्तीला सन्मान व प्रतिष्ठा मिळेल, अशी समाजव्यवस्था त्यांना हवी होती.[47] कारण अशी समाज-व्यवस्था हाऱ्या अर्थाने जातिप्रथेचा विच्छेद करू शकेल, असा त्यांना विश्वास होता. म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वांवर आधारलेल्या आदर्श समाजाची कल्पना मांडली.

परंतु अशाप्रकारची आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्वप्रथम जातिव्यवस्थेचा बिमोड केला पाहिजे व संपूर्ण हिन्दू समाज जाति-विहीन किंवा एकवर्णी केला पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांना वाटते. जातिप्रथा नष्ट करण्यासाठी काय केले पाहिजे ? या समस्येवर डॉ. आंबेडकरांनी सांगितलेली उपाययोजना अत्यंत मूलगामी आहे. ते म्हणतात की, जातिभेदाची समस्या दूर करण्यासाठी हिन्दू समाजाची मानसिक व सामाजिक घडण बदलली पाहिजे. कारण लोकांच्या जातिप्रथेविषयीच्या प्रवृत्ती, सवयी व समज कायम ठेवून सुधारणा करणे अशक्य आहे. सद्य: स्थितीत जातिनिष्ठ असलेल्या हिन्दू समाजात जाति तशाच ठेवून कोणतीही सुधारणा घडून येणे असंभव आहे. जातींच्या आधारावर राष्ट्र निर्माण करता येणार नाही. ते समर्थ व बलवान करता येणार नाही. म्हणून ते म्हणतात, "जातीच्या आधारावर काहीही करायला जाल तर ते कोसळून पडल्याशिवाय राहणार नाही."[48]

असा हा जातिभेद कसा नष्ट करायचा या प्रश्नावर त्यांनी विशेष भर दिला आहे. सामाजिक सुधारणा व जातिप्रथा निर्मूलन यादृष्टीने पहिला प्रयत्न म्हणून प्रथम पोटजाती नष्ट करण्याची जी एक कल्पना आहे, तिला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला आहे. त्याच्यामते, प्रथम पोटजाती नष्ट करणे हा जातिभेद निर्मूलनाच्या दृष्टीने प्राथमिक तसेच प्रभावी उपाय होऊ शकत नाही. आणि तसे करणे ही फार मोठी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

चूक आहे.[४९] कारण पोटजाती नष्ट झाल्या तरी कालांतराने जाती नष्ट होतीलच असे म्हणता येणार नाही. उलट पोटजातींचे विलीनीकरण जाति-जातिंमधील भेदाला बळकटी आणील.[५०] म्हणून ते म्हणतात, "पोटजाती नष्ट करण्याचा उपाय व्यवहार्य तर नाहीच परंतु परिणामकारकही नाही आणि सदोष ठरण्याचाच संभव जास्त."[५१]

जातिप्रथेचा विच्छेद करण्यासाठी रोटीबंदी तोडावी आणि जाति-जातीमध्ये सहभोजनाला सुरुवात करावी, असाही दुसरा एक उपाय सुचविला जातो. परंतु आंबेडकरांच्या मते, हा विचारही फारसा परिपक्व नाही. कारण ते म्हणतात, आज अनेक जातींमध्ये परस्पर सहभोजनाची प्रथा सर्रास रूढ आहे. या आंतरजातीय सहभोजनांमुळे हिन्दूची जातीय भावना मुळीच नष्ट झालेली नाही. त्यामुळे हा उपाय जातिप्रथा नष्ट करण्याच्यादृष्टीने उपयुक्त व परिणामकारक ठरत नाही.[५२] ही प्रथा नष्ट करण्यासाठी मानसिक घडण बदलली पाहिजे आणि त्यासाठी आंतरजातीय विवाह हाच प्रभावी उपाय आहे, असे त्यांचे मत आहे. सहभोजनाने जातिजातितील वेगळेपणाची वृत्ती नि जाणीव मेलेली नाही. ती जाणीव आंतरजातीय विवाहाच्या पध्दतीने मारणे व समाज एकसंध करणे शक्य आहे. कारण जाति-जातीतील विवाह पध्दतीमुळे रक्तात एकजीवत्व येईल आणि त्यामुळे एकत्व व बंधुभावना निर्माण होऊ शकेल. आणि बंधुभाव निर्माण करण्यास रक्तमिश्रण हेच एकमेव औषध आहे. अशी सजातीयपणाची भावना बलवत्तर झाल्याशिवाय जातिजातीतील भेदभाव नाहीसा होणार नाही.[५३]

डॉ. आंबेडकरांच्या मते, जातिभेद ही एक भावना आहे. ती मनाची एक अवस्था आहे. या भावनेचा नाश करणे म्हणजेच भावनात्मक किंवा मानसिक घडण बदलणे होय. हा भावनिक बदल घडविण्यासाठी

सर्वप्रथम धर्मशास्त्रावरील हिन्दूची श्रध्दा नष्ट केली पाहिजे. ते म्हणतात, हिन्दू जाती पाळतात. कारण ते धार्मिक रुढींचे, धर्मग्रंथांचे अभिमानी आहेत. त्यामुळे ते जाती पाळतात ही त्यांची चूक नाही तर त्यांना जातिभेद पाळण्यास शिकविणारी हिन्दू धर्मशास्त्रे त्यांची खरी शत्रू आहेत. सर्वप्रथम त्यांची धर्मशास्त्रांवर असलेली श्रध्दा दूर केली पाहिजे. धर्मशास्त्रे परमेश्वरनिर्मित, व पवित्र आहेत, ही हिन्दूची मानसिक श्रध्दा आहे या मानसिक गुलामगिरीतून त्यांची सुटका केली पाहिजे.

त्यांच्यामते, जातिप्रथा दूर करण्यासाठी पारंपरिक चातुर्वर्ण्यप्रथेचे पुनरुज्जीवन करणे हा उपाय अयोग्य आहे. कारण जात व वर्ण या मूलत: भिन्न संकल्पना किंवा प्रथा आहेत. केवळ भिन्नच नव्हे तर परस्पर विरोधी आहेत. जात ही जन्मावर आधारलेली आहे. जातीवरुन कार्य ठरते. त्यामुळे हीन जातीच्या सदस्याला आपल्या अंगीभूत गुण व कर्मानुसार उच्च जातीत स्थान मिळावे यासाठी प्रथम जातींचा उच्छेद करावा लागेल. परंतु यादृष्टीने आंबेडकरांना अशी समस्या वाटते की जन्मनिष्ठतीत असलेल्या चार हजार जाती कशा तोडणार व कर्मनिष्ठ चातुर्वर्ण्य कसा निर्माण करणार? [54] कारण चातुर्वर्ण्य लागू करण्यासाठी प्रथम जातिविच्छेद करुन समाज एकवर्णी केला पाहिजे व मग त्याची स्वभाव, गुण, कर्म या आधारावर चार वर्णांत विभागणी केली पाहिजे. पण असे काटेकोर विभाजन करणे शक्य आहे का? व्यक्ती-व्यक्तींची गुण, कसब, मनोवृत्ती व स्वभाव वैशिष्टये भिन्न असतात. अशा परिस्थितीत कोणत्या निकषांच्या आधारे हे विभाजन करणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे चातुर्वर्ण्य पध्दतीचा पुरस्कार करणारे समर्थक देऊ शकत नाहीत.

तसेच जर चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाज रचना निर्माण केली तर ती रचना कायम राखता येईल काय? [55] अशा समाजात समाजाचे स्थान

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

काय राहिल ?[५६] असे अनेक अडचणीचे व अनुत्तरीत प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे जातिप्रथा निर्मूलनासाठी चातुर्वर्ण्याचे पुनरुज्जीवन करण्याची कल्पना डॉ. आंबेडकरांना मान्य नाही. त्यांच्यामते, पूर्वीची चातुर्वर्ण्य व्यवस्था शुध्द राहाता न आल्याने जन्मनिष्ठ अशा जातिभेदाची निर्मिती झाली. म्हणून चातुर्वर्ण्याचे पुनरुज्जीवन हा जातिभेद निर्मूलनाचा उपाय होऊ शकत नाही. "जोपर्यंत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ही नावे अस्तित्वात आहेत, तोपर्यंत ही नावे एका विशिष्ट उच्च नीच भावनेची द्योतक आहेत व ती जन्मजात आहेत, असेच प्रत्येक हिन्दू समजेल व त्याप्रमाणे वागेल."[५७] असे त्यांना वाटते.

या संदर्भात त्यांनी धर्मग्रंथांचे वर्चस्व व गुलामगिरी नष्ट करण्याच्या मार्गांचा विचार केला. हिन्दूंचे धर्मग्रंथ हे ईश्वर निर्मित नसून मानव निर्मित आहेत हे डॉ. आंबेडकरांनी वारंवार सांगितले. या धर्मग्रंथांवरील श्रध्दा व त्यांचे प्रामाण्य नष्ट करणे हे अतिशय अवघड काम आहे. ज्या धर्मग्रंथांच्या आज्ञांनी व नियमांनी हिन्दू समाजाची रचना व धारणा निर्मिली त्यांचा प्रभाव नष्ट करणे हा जातिनिर्मूलनाच्या दृष्टीने परिणामकारक उपाय ठरु शकतो. कारण याच धर्मग्रंथांच्या शास्त्र व वचनांच्या आज्ञेवरुन जाती व वर्णसंस्थेची घडण टिकून राहिली आहे. ही घडण मोडण्यासाठी जातिंना धर्मशास्त्रांचा आधार आहे व धर्मशास्त्रांना दैवी आधार आहे हा विश्वास नष्ट केला पाहिजे.

या संदर्भात त्यांनी मांडलेले विचार अत्यंत शास्त्रीय, बुध्दीवादी व परिवर्तनवादी आहेत. डॉ. आंबेडकर धर्माकडे व्यक्तीजीवनाची धारणा व उन्नती करणारे साधन यादृष्टीने पाहतात. म्हणून ते म्हणतात कोणत्याही धर्माची जेव्हा स्थापना होते तेव्हा त्या काळातील ती प्रगतीच असते. परंतु कालांतराने धर्मग्रंथांना दैवी अधिष्ठान प्राप्त होते

आणि धर्म हा उन्नतीच्या मार्गातील अडसर बनतो. म्हणून कोणत्याही धर्मग्रंथाला दैवी अधिष्ठान प्राप्त होणे समाजाच्यादृष्टीने घातक ठरते. कारण परिस्थितीत सातत्याने बदल होत असतात. प्रगती, सुधारणा व बदल यांचा प्रवाह अखंडपणे वाहात असतो आणि कर्मठ धर्मशास्त्रांमुळे या प्रवाहात अडथळा निर्माण होतो. परिणामी अशा समाजाची पिछे हाट सुरु होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, हिन्दू समाजाच्या प्रगतीच्या मार्गात धर्मशास्त्राचा मोठा अडसर निर्माण झाला आहे. शास्त्र व वचनांच्या आज्ञा हिन्दू समाजाच्याहिताकरिता नसून त्या त्यांच्या नाशास कारणीभूत झाल्या आहेत. सर्वच हिन्दू या शास्त्र, वचनांची गुलाम बनले आहेत. या शब्दप्रामाण्याचा हिन्दूवर इतका मोठा प्रभाव पडला आहे की त्यांनी आपली स्वतंत्र विचार शक्ती, विवेकबुध्दी गमावली आहे. या धर्मग्रंथांनी हिन्दूंना निर्बुध्द व विचारहीन बनविले आहे, हे त्यांनी वेद, पुराण व उपनिषदांचा दाखला देऊन स्पष्ट केले आहे.[५८] अशाप्रकारे प्रत्येक हिन्दूने शास्त्र व स्मृति यांतील नियमांविषयी कोणताही वाद निर्माण न करता त्यांचे निमूटपणे पालन करणे हाच हिन्दूंचा खरा धर्म बनला आहे. जात व वर्णासंबंधी स्वतंत्रबुध्दीने विचार करण्यास शास्त्रांनी हिन्दूंना मनाई केली आहे आणि अशी ही जातिसंस्था विचार स्वातंत्र्य, कृतिस्वातंत्र्य या मूल्यांशी सुसंगत आहे किंवा नाही, इष्ट आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार नसेल तर ही जातिसंस्था मोडणार कशी ? यादृष्टीने जात्युच्छेदाचे कार्य अवघड आहे, असे त्यांना वाटते आणि अशा अभेद्य जातिसंस्थेला उच्चाटण्यासाठी सर्वप्रथम माणसास कर्तृत्व-शून्य व स्थितप्रज्ञ बनविणाऱ्या, श्रुति-स्मृति, पुराणांचे मानसिक वर्चस्व झुगारुन दिले पाहिजे, असे त्यांना वाटते.[५९]

शास्त्र-वचनांचे प्रामाण्य झुगारुन देणे ही कल्पना काहींना धर्म-विरोधी वाटण्याची शक्यता त्यांनी गृहित धरली आहे. याबाबतीत

डॉ. आंबेडकर असे स्पष्टीकरण देतात की, बदलत्या काळाच्या ओघात हिन्दू धर्म तत्त्वे अहितकारक ठरत आहे. त्यामुळे त्यात काळानुसार बदल करणे आवश्यक आहे. हिन्दू धर्मात परिस्थिती व काळानुसार बदल करणे म्हणजे काय करणे ? याचे उत्तर देताना ते म्हणतात हिन्दू धर्माला तात्त्विक स्वरूप दिले पाहिजे. त्याचे नियमप्रधान किंवा आज्ञाप्रधान स्वरूप आहे ते प्रथम नष्ट केले पाहिजे. कारण हिन्दू धर्म, हा इतर काही नसून कर्मकांडे, याज्ञिक, सामाजिक व सोवळ्याओवळ्याचे नियम, बंधने या साऱ्यांचे कडबोळे आहे. ज्याला हिन्दू लोक धर्म म्हणून समजतात तो धर्म नसून निव्वळ हे करा व ते करू नका अशा आज्ञा व बंदया आहेत.[६०] अशी बंधने लोकांना स्वतंत्र, स्वयंस्फूर्त जीवनापासून परावृत्त करतात व लादलेल्या बाह्य नियमांचे दास बनवितात त्यामुळे हे दास्यत्व झुगारून दिले की हिन्दूंना त्यांचे स्वातंत्र्य व अधिकार प्राप्त होतील.

हिन्दू धर्मग्रंथ ऋषीमुनी किंवा धर्मवेत्यांनी लिहिलेले आहेत, अशा एकांगी व चुकीच्या भूमिकेपोटी त्यांनी हिन्दू धर्माला व धर्मशास्त्रांना विरोध केलेला नाही. तर या धर्मवचनांना जे अपरिवर्तनीय व शाश्वत आणि दैवी स्वरूप प्राप्त झाले आहे त्याला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला आहे. त्यांच्या मते, कोणताही धर्म सनातन व अपरिवर्तनीय समजण्याची फार मोठी चूक केली जाते. वास्तविक धर्म म्हणजे समाजाचे नियमन करणाऱ्या परिस्थिती व कालसापेक्ष नियमांचा समुच्चय आहे. या वस्तुस्थितीची जाणीव लोकांना करून दिली तर ते विधायक धर्मतत्त्वांच्या परीवर्तनास तयार होतील.

नियमाधिष्ठीत धर्माऐवजी तत्त्वनिष्ठ धर्माची निर्मिती करण्यासंबंधी एक योजना डॉ. आंबेडकरांनी सांगितली आहे.[६१] या नवीन धर्मात खालील तत्त्वांचा प्राधान्याने समावेश केला पाहिजे --

१) संपूर्ण हिन्दू समाजासाठी विशिष्ट असा एकच धर्मग्रंथ असावा. तो सर्वमान्य, सर्वसमावेशक व प्रमाणभूत मानला जावा.

२) हिन्दू समाजात पौरोहित्य अनुवंशिक ठेवू नये. स्वतःला हिन्दू समजणारी कोणतीही व्यक्ती ती कोणत्याही जातीची असो- पौरोहित्वास पात्र समजली जावी.

३) सरकारकडून अधिकृत पौरोहित्याची सनद घेतलेल्या व्यक्तीने केलेले धार्मिक विधी कायदेशीर समजले जावेत.

४) पुरोहिताच्या आचरणावर कायदेशीर निर्बंध असावेत.

५) पुरोहित व्यवसायावर शासनाचे नियंत्रण असावे.[६२]

आंबेडकरांच्या मते, वरील तत्वाधिष्ठीत धर्माची कल्पना ब्राह्मण धर्माचा पर्यायाने जातीयवृत्तीचा विध्वंस करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल आणि एकदा ब्राह्मण्याचा विध्वंस झाला की जातीयता नष्ट करणे सोपे होईल. कारण हिन्दू धर्मास कीड लावणारे ब्राह्मण धर्म हे विष आहे. अशा- प्रकारे अतिरेकी धर्मश्रध्दा व जातीयवृत्ती यांचा नाश करुन जातिविहीन अशा एक वर्णी समाजाची निर्मिती केली पाहिजे व हा समाज स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या वैश्विक जीवन मूल्यांवर आधिष्ठीत असला पाहिजे. अशा आदर्श व उच्च मूल्यांचे दुसऱ्या समाजाकडून अनुकरण करण्याची आवश्यकता नाही ही तत्त्वे उपनिषदात सापडतात.

डॉ. आंबेडकरांची आदर्श धर्माची कल्पना अशा व्यापक व व्यावहारिक तत्त्वत्रयींवर आधारलेली आहे. नव्या व आदर्श धर्माचा अर्थ म्हणजे हिन्दूंच्या धर्मतत्त्वात, त्यांच्या जाणीवेत, दृष्टीकोनात व पर्यायाने समग्र जीवनात अमूलाग्र बदल असा त्यांनी सांगितला आहे.

## डॉ. आंबेडकर: जातिनिर्मूलनाचे राजकारण:

### १) कॉंग्रेस व सवर्ण राजकारणी पुढाऱ्यांवर केलेली टीका:

डॉ. आंबेडकरांच्या जातिनिर्मूलनविषयक विचारांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की त्यांचे विचार तत्कालीन राजकारणी पुढाऱ्यांपेक्षा काहीसे भिन्न आहेत. हिन्दू समाज व हिन्दू राष्ट्र यांचा हिताच्यादृष्टीने जातिसंस्था अनिष्ट आहे. हे इतर पुढाऱ्यांनी मान्य केले. तिच्या निर्मूलनाची आवश्यकताही त्यांना मान्य होती. तरीही तिच्या निर्मूलनाच्या मार्गांविषयी इतर पुढारी विशेषत: कॉंग्रेस, व सवर्ण राजकारणी आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांत भिन्नता आहे.

तत्कालीन राजकीय पुढारी जातिनिर्मूलन व अस्पृश्यतानिवारण ही दोन वेगवेगळी कार्ये मानतात. परंतु आंबेडकर त्यात फरक करीत नाहीत. म. गांधींच्या "हरिजन" साप्ताहिकास पाठविलेल्या संदेशात ते लिहितात, "अस्पृश्यता हा जातिभेदाचा आविष्कार किंवा परिणती आहे. जोपर्यंत जाती आहेत तोपर्यंत अस्पृश्यता असणारच. जातिभेदाचे निर्मूलन केले तरच अस्पृश्यांचा उध्दार होईल."[६३]

त्यांच्या काळातील ज्या समाजसुधारकांना व राजकारणी पुढाऱ्यांना जातिनिर्मूलनाची आवश्यकता पटली होती त्यांचे सुधारणेचे मार्ग वरवरचे होते. ते म्हणजे भेटीबंदी, रोटीबंदी तोडणे होय. यासारख्या सौम्या मार्गांनी जातिभेदाचे उच्चाटन होईल असा त्यांचा समज होता. मात्र बेटीबंदी तोडणे किंवा आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देणे यासारखे मार्ग या सुधारकांकडून वापरले जात नसत. कॉंग्रेस, हिन्दु महासभा, आर्यसमाज या संघटनांचे कार्यकर्ते बहुसंख्येने असलेल्या हिन्दु कांचे मन न दुखाविता जमेल तसे जातिनिर्मूलनाचे कार्य करीत असत. बहुसंख्य हिंन्दुंचा बेटीबंदी तोडण्याच्या

मार्गाला विरोध होता. समाजातील उच्च वर्ग खालच्या वर्गांना बरोबरीचे अधिकार देण्यास तयार नव्हता. त्यांचा रोष पत्करून समाज सुधारणा करण्याचा व जातिनिर्मूलन करण्याचा कॉंग्रेस, हिन्दु महासभा व आर्य समाजी सुधारकांचा विचार नव्हता. म्हणजेच उच्च वर्गीयांच्या हितसंबंधांना धक्का न लावता त्यांना जातिनिर्मूलन करायचे होते. त्यामुळे जातिनिर्मूलनाचा व्यापक कार्यक्रम त्यांनी कधीच हाती घेतला नाही. त्यांचे कार्य बरेचसे प्रचारकी थाटाचे असे.

जातिभेद निर्मूलन आणि अस्पृश्यता निवारण याविषयी गांधी व आंबेडकर यांच्यातील मतभेद प्रसिध्द आहेत. गांधींना अस्पृश्यांविषयी विशेष कळकळ वाटत होती. त्यांच्या स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून त्यांनी अनेक प्रयत्न केले. परंतु त्यांनी जातिभेद निर्मूलनाच्या कार्याला कधीच अग्रक्रम दिला नाही. त्यांची जातिप्रथा, वर्णाश्रम पध्दती, समताधिष्ठित समाज रचना किंवा आदर्श समाज याविषयीची मते अतिशय भिन्न होती. गांधीजी अस्पृश्यांचे हक्क, आणि त्यांच्या मंदिरप्रवेशाविषयी कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल बोलत. अस्पृश्यता ही हिन्दु धर्मातील अनिष्ट प्रथा आहे असे ते म्हणत. तसेच स्वत:ला सनातनी व कट्टर वर्णाश्रमवादी म्हणवून घेत. अस्पृश्यता, जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, मंदिरप्रवेश सहभोजन, मिश्र विवाह याविषयीच्या त्यांच्या भूमिकेमुळे त्यांचे सहकारी व अनुयायी गोंधळून जात.[६४] या अर्थाने डॉ.आंबेडकरांना गांधीजींशी जो सतत संघर्ष करावा लागला त्याचे मूळ गांधीजींच्या वैचारिक भूमिकेत आहे.

सवर्ण राजकारणी अत्यंत धूर्तपणे जातिभेद निर्मूलनाच्या कार्याचा विचार करीत. एकीकडे जातिवर्चस्व कायम ठेवून दुसरीकडे अस्पृश्य वर्गाच्या मनात त्यांच्या हक्कांविषयी जाणीव निर्माण होऊ नये व त्यांनी

सवर्ण हिन्दूंच्या बरोबरीने समतेचे हक्क मागू नयेत यादृष्टीने प्रयत्नशील असत. जन्मनिष्ठ जातिव्यवस्थेला धक्का न लावता वरवरच्या व कुजबी सुधारणा करण्याचा त्यांचा प्रयत्न असे परंतु जातिभेदाचे अनिष्ट व विषम स्वरूप पूर्णपणे नष्ट करून एकवर्णी किंवा जातिविहीन समाज निर्माण करण्याचे भरीव व प्रामाणिक प्रयत्न त्यांच्याकडून कधीच झाले नाही. तसे कार्यक्रम किंवा उपक्रम त्यांनी हाती घेतले नाहीत. थोडक्यात हिन्दू धर्माची "पोलादी चौकट" कायम ठेवून मेहेरबानी दाखल सवलती देऊ पाहणाऱ्या व अस्पृश्यांच्या नैसर्गिक हक्कांना महत्त्व न देता केवळ आपल्या धर्मतत्त्वांचे वर्चस्व खुलून दिसावे म्हणून जातिनिर्मूलनाचे कार्य करणाऱ्या मतलबी व वर्चस्वलोलुप सुधारकांपेक्षा डॅ. आंबेडकरांचे विचार सर्वस्वी भिन्न आहेत.

या संदर्भात डॉ. आंबेडकर प्रतिगामी व सनातनी सुधारणावादी यात फरक करीत नाहीत. सुधारणा नको असे म्हणणाऱ्या प्रतिगामी लोकांत व सुधारणा हवी पण ती कालगतीवर सोपवून काही न करणाऱ्या प्रागतिक लोकांत विशेष अंतर आहे, असे त्यांना वाटत नाही. उलट दुसऱ्या प्रकारचे लोकच सुधारणेच्या मार्गातील अडथळे आहेत. त्यांच्यापासून सुधारणेच्या कार्याला कोणताही लाभ होणे शक्य नाही. म्हणून ते म्हणतात, हल्लीच्या सुधारणेच्या लढयात जातीशी एकनिष्ठ राहणाऱ्या सुधारणावादी लोकांकडून सुधारणेचा प्रसार होण्यासारखा नाही. सुधारक व सनातनी यांच्यातील वाद तत्त्वाचा असल्यामुळे सुधारक हा मुळातच स्वजातीचा शत्रू असतो.[६५] त्यामुळे सुधारणा तर होत नाहीच पण सुधारणेच्या कार्याची विटंबना होते.

त्याकाळातील ब्राह्मण्यग्रस्त सवर्ण पुढारी राजकीय हक्क आणि राजकीय सत्ताप्राप्तीसाठी आग्रहाने लढत. परंतु सामाजिक सुधारणा,

धार्मिक क्रांती याविषयीची त्यांची भूमिका अत्यंत प्रतिगामी होती. या बाबतीत ते फारसे उत्साही व अनुकूल नव्हते. ऐतिहासिक परंपरा असलेल्या अस्पृश्य समाजाचे प्रश्न सोडविण्याची राष्ट्रीय गरज सुक्ष्म दूरदर्शी व राष्ट्रीय नेत्यांना तसेच सुधारकांना भासली नाही. त्यामुळे त्यांनी आपले ध्येय केवळ राजकीय सत्ताप्राप्तीपुरते मर्यादित ठेवले. त्यांना राजकीय सत्ता हवी होती आणि ती ही केवळ सवर्ण हिन्दूंनीच वापरावी अशी त्यांची इच्छा होती. यादृष्टीने सवर्ण हिन्दूंचे समाज सुधारणेचे कार्य म्हणजे हिन्दू संघटन आणि हिन्दु संघटन म्हणजे ब्राह्मण संघटन यापुरते मर्यादित होते.

थोडक्यात सवर्ण राजकारणी पुढाऱ्यांनी व्यापक तात्त्विक व व्यावहारिक पातळीवर घोजन हाऱ्या समाजाच्या सुधारणेचा आग्रह कधीच धरला नाही. त्यांचे सुधारणेचे प्रयत्न मर्यादित उद्दिष्टां-पलिकडे जाउ शकले नाही व त्यांना व्यापक राष्ट्रीय संदर्भ प्राप्त झाला नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे हे सर्व सुधारक राजकीय क्षेत्रात प्रगतिवादी तर समाजकारण आणि धर्मकारण यात प्रतिगामी दृष्टी बाळगणारे होते.

## २) डॉ. आंबेडकरांनी सुरु केलेल्या विविध सामाजिक चळवळी:

डॉ. आंबेडकरांनी आपले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक उपक्रम तसेच कार्यक्रम हाती घेतले. सामाजिक क्षेत्रातून गुलामगिरी, अस्पृश्यता व असमानता यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांनी दलित व अस्पृश्य वर्गाला क्रांतीप्रवण केले. त्यांच्यात आत्मन्नोतीची जाणीव निर्माण केली. अन्यायविरूद लढा देण्याचे बळ निर्माण केले. त्यामुळे त्यांच्यात श्रेष्ठ वर्गीयांच्या अमानास्पद वागणूकीविरूद चिड निर्माण

झाली. आपण सर्व एकाच हिन्दू धर्माचे घटक असल्याने सर्वांना समान हक्क असले पाहिजे, हा समतेचा विचार त्यांनी समाजात निर्माण केला. तसेच समान हक्क देण्यास हिन्दू धर्मिय व उच्च वर्गीय तयार नसतील तर लढा देऊन हे हक्क मिळविले पाहिजेत अशी लढाऊ वृत्ती त्यांनी उपेक्षित वर्गात निर्माण केली. दलितांनी सवर्णांच्या सहानुभूती किंवा ते समानतेचे हक्क देतील अशा खोटया अपेक्षेवरविसंबून न राहता समान हक्क व दर्जा मिळविण्यासाठी क्रांती, सत्याग्रह किंवा चळवळ यासारख्या प्रत्यक्ष मार्गाचा अवलंब केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

केवळ धार्मिक क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, राजकीय, सार्वजनिक अशा सर्वच क्षेत्रात समतेचे हक्क मिळविण्यासाठी सत्याग्रहाशिवाय अन्य पर्याय नाही, असे त्यांना वाटत होते. ब्राह्मणी वर्चस्व व धर्मशास्त्रांची गुलामगिरी यांना सत्याग्रहाच्या मार्गाने धक्का दिले पाहिजे, या भूमिकेतून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्योध्दार व समतेच्या हक्कांसाठी अनेक चळवळी हाती घेतल्या. त्यात प्रामुख्याने महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह व पुणे येथील पर्वती सत्याग्रह यांचा उल्लेख करता येईल.

महाराष्ट्रातील अस्पृश्यांनी सर्वप्रकारच्या गुलामगिरीविरुध्द बंड केले पाहिजे हे डॉ. आंबेडकरांनी विचारांती ठरविले. त्यादृष्टीने संघटित सत्याग्रहाचा प्रयत्न कोठे करावा यावर त्यांनी विचार केला. सुरुवातीला त्यांना वाटले की महाराष्ट्रातील प्रमुख पवित्र धर्मपीठ असलेल्या पंढरपूर क्षेत्री सत्याग्रह घडवून आणावा. परंतु अखेरीस त्यांनी महाड येथे सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला.

महाड येथील सत्याग्रह अस्पृश्य वर्गाकडून होणार होता. त्याला सवर्ण हिन्दूकडून विरोध होण्याची शक्यता होती. परस्परांत संघर्ष होईल. या संघर्षात स्पृश्यास्पृश्यतेच्या भ्रामक समजुती जळून जातील, असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. तसेच वर्णानुवर्ण भेदभावामुळे विखुरलेला दलितवर्ग संघटित करण्यासाठी, त्यांच्यात स्वत:च्या हक्कांविषयी जाणीव निर्माण करण्यासाठी व अन्यायाविरुद्ध लढा देण्याची शक्ती व आत्म-विश्वास निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी महाड येथे सत्याग्रह करण्याचा निर्णय जाहिर केला.[६६]

२० मार्च १९२७ या दिवशी अस्पृश्य वर्गाकडून समतेचा लढा पुकारण्यात आला. डॉ. आंबेडकर व त्यांच्या हजारो सत्याग्रहींनी महाडच्या चवदार तळयावर जाऊन अस्पृश्यवर्गाचा हक्क प्रस्थापित केला. सत्याग्रहाचा एक भाग म्हणून ज्या मनुस्मृतिने अस्पृश्य वर्गाला हीन दर्जा व दास्य दिले त्या मनुस्मृतिचे दहन करण्यात आले. "मनुस्मृति का जाळली ?" या लेखात डॉ. आंबेडकर लिहितात, "स्वयंनिर्णयाचे तत्त्व प्रस्थापित करण्यास निघालेल्या सुधारणा-वाद्यास असला ग्रंथ कधीच मान्य होणे शक्य नाही व तो अस्पृश्य वर्गासही मान्य नाही. एवढेच दर्शविण्याकरता महाड येथे त्याची होळी करण्यात आली."[६७]

या सत्याग्रहाच्या निमित्ताने भरविण्यात आलेल्या परिषदेत ३३ ठराव मंजूर करण्यात आले. स्पृश्य वर्ग व सरकार यांनी अस्पृश्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रगतीसाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत याविषयीचे ते ठराव होते.[६८] अस्पृश्यवर्गाने महाड येथे धर्म संगर करुन उच्च वर्णीयांच्या वर्चस्वाला व जातिभेदाच्या मजबूत तटबंदीला धक्का दिला. त्यांच्या सत्याग्रहाला सवर्ण हिन्दू समाजाकडून प्रखर विरोध

झाला. जीर्णमतवादी सवर्ण हिन्दूंना विशेषत: ब्राह्मण वर्गाला महाडची क्रांती भयंकर अधार्म्य व पापमूलक वाटली. काही हिन्दूना अस्पृश्य वर्गाला समान हक्क देण्याविषयीची भूमिका पटली. परंतु त्यांनी ते स्पष्टपणे मान्य करण्याची मानसिक तयारी दाखविली नाही. या कारणामुळे हिन्दूंनी महाडच्या क्रांतीला उघड वा आडमार्गाने विरोध केला.

हिन्दूधार्माचे मलीन व हीन स्वरूप नष्ट करावे व त्या धार्माला मानवता धार्माचे स्वरूप प्राप्त करून यावे हे अस्पृश्यांच्या चळवळीचे महान ध्येय होते. परंतु महाड धार्मसंगरामुळे डॉ. आंबेडकरांचा हेतू बराच सफल झाला. सवर्ण हिन्दू व अस्पृश्य वर्ग यांच्या मनात ज्या धार्मिक श्रध्दा हजारो वर्षे रूजून बसल्या होत्या त्याचे कारण हिन्दूंच्या धार्मशास्त्रांची तशी शिकवण होती.[६९] धार्मशास्त्रांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हा लढा दिला गेला. हिन्दूंचे वेद, शास्त्रे व पुराणे ईश्वर निर्मित नसून उच्च वर्णीयांच्या स्वार्थीवृत्तीचा तो आविष्कार आहे. त्यामुळे शास्त्रांच्या शिकवणीच्या शृंखला हिन्दूंच्या मानसिक, बौध्दिक आणि आध्यात्मिक अस्तित्वासभोवती जखडून गेल्या होत्या. या क्रांतीच्या सहाय्याने सर्वच हिन्दूंची त्या शृंखला तोडून मुक्तता करण्याचे त्यांचे ध्येय होते. या शृंखलांना व वर्णानुवर्णांच्या तटबंदीला या क्रांतीद्वारे धक्का दिला. हिन्दू समाजाकडून अस्पृश्यांना मिळणाऱ्या अन्यायकारक वागणुकीची चीड अस्पृश्यांप्रमाणेच स्पृश्यांच्या मनातही निर्माण झाली. तसेच हजारो वर्षे वरिष्ठ वर्गीयांच्या गुलामगिरीत राहून नैसर्गिक मानवी हक्कांवर पारखे झालेल्या वर्गाच्या मनातही आपल्या हक्काविषयी जाणीव निर्माण झाली.

महाड धार्मसंगराचे महत्त्वाचे परिणाम स्पृश्य तसेच अस्पृश्य समाजावर मोठ्याप्रमाणात झाले. दलित वर्गाने स्वत:च्या बळावर समतेची चळवळ

सुरु करुन ती संपूर्ण महाराष्ट्रात पसरविली. त्यांच्या संख्याबलाची व आत्मशक्तीची प्रचीती सवर्ण हिन्दूंना आली. दलित वर्गाच्या मनात लढाऊ वृत्ती निर्माण करुन त्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणण्याचा हेतू या क्रांतीने यशस्वी झाला. अन्यायाने दबून वागणारा अस्पृश्य वर्ग मानाने व धैर्याने वागेल, सामाजिक, आध्यात्मिक तसेच आर्थिक क्षेत्रात वरिष्ठ वर्गाचे असलेले वर्चस्व मोडून काढील, असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला.

महाडच्या सत्याग्रहापासून स्फूर्ति घेऊन अस्पृश्यांनी अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. दुसरा सत्याग्रह पुणे येथील पर्वतीच्या मंदिरासमोर करण्यात आला. पेशवाईत ब्राम्हण जातीला पुन्हा नव्याने महत्त्व व श्रेष्ठत्त्व प्राप्त झाले. मराठी राज्याचे सर्व अधिकार हाती आल्यानंतर पेशव्यांनी ब्राम्हण जातीचे श्रेष्ठत्व हिन्दु समाजात प्रस्थापित करण्याचा कार्यक्रम पध्दतशीरपणे हाती घेतला.[७०] या कार्यक्रमाला ब्राम्हणांचा व मराठा सरदारांचा पाठिंबा होता. त्याला विरोध होता तो फक्त ज्या जातींना या कार्यक्रमामुळे अन्याय सहन करावा लागणार अशा त्या कनिष्ठ जातींचा. त्यामुळे पेशवाईतील ही सामाजिक विषमता व अन्याय यांना विरोध करण्यासाठी पर्वती सत्याग्रह करण्यात आला.

पुणे हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे व बौध्दिक सामर्थ्याचे जरी केंद्र असले तरी तेथे पेशवेकाळात अस्पृश्य वर्गाचा भयंकर छळ करण्यात आला. अस्पृश्यतेचे हे अत्यंत विकृत स्वरुप संपूर्ण महाराष्ट्रभर थैमान घालीत होते. त्याच्या थैमानाला पायबंद घालण्यासाठी अस्पृश्य वर्गाने पुण्याचा पर्वती सत्याग्रह करण्याचा निर्धार केला. पर्वती मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करावा आणि वेळ आली तर सत्याग्रह करावा याबद्दल विचार घेण्यात आला. त्यावेळी असे ठरविण्यात आले की, आज हजारो वर्षांपासून

जातिभेदामुळे आमचा समाज आणि आमचा देश अधोगतीस लागला आहे. तेव्हा आता यापुढेही ही अशी स्थिती राहू देणे आम्हास असह्य झाले आहे. म्हणून आता आम्ही देवळे, सार्वजनिक धर्मशाळा व पाणवठे यांचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.[७१]

महाड सत्याग्रहाप्रमाणेच पर्वती मंदिर सत्याग्रहाविषयी अनेक उलट-सुलट, अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया उमटल्या. पुण्यातील सनातनी ब्राह्मणांमध्ये खळबळ उडाली. त्यांनी अनेक भाषणे, वृत्तपत्रे या माध्यमातून अस्पृश्य वर्गावर कडक टीका केली. तसेच पर्वती सत्याग्रहाला महाराष्ट्राच्या विविध भागातून पाठिंबा मिळाला. त्याला पाठिंबा देणाऱ्या सभा झाल्या. त्यात स्पृश्य लोकांच्या वागणूकीचा व त्यांच्या बहिष्कृतांबद्दलच्या दृष्टीकोनाचा निषेध करण्यात आला व अस्पृश्यांच्या या उपक्रमाबद्दल कौतुक करण्यात आले. तसेच मुंबई, नाशिक यासारख्या ठिकाणी असे सत्याग्रह करण्याचा निर्णय घेण्यात आला. अखेरीस १३ ऑक्टोबर १९२९ ला सुरु झालेला पर्वती मंदिरप्रवेश सत्याग्रह मारामारी, दंगल या कारणांमुळे २० जानेवारी १९३० ला तहकूब करण्यात आला. पंचांनी मंदिराचे दरवाजे बंद केले. त्यामुळे हा सत्याग्रह पुन्हा झाला नाही.[७२]

अमरावती, महाड आणि पुणे येथे अस्पृश्यांनी घडवून आणलेल्या सत्याग्रहामुळे महाराष्ट्रांतील अस्पृश्यांमध्ये आत्मशक्ती निर्माण झाली. स्वबळाच्या जोरावर हक्क प्राप्त करून घेण्याची प्रेरणा त्यांच्यात निर्माण झाली. त्या प्रेरणेतून नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय नाशिक जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी घेतला. नाशिक हे पवित्र तीर्थ मानले जाते.

त्यामुळे अस्पृश्य वर्गाने आपली सर्व शक्ती पणाला लावून लढा दयावा. कारण या सत्याग्रहाच्या यशापयशावर पुढील चळवळीचे भवितव्य अवलंबून होते. नाशिक येथील परिस्थिती थोडी वेगळी होती. महाड आणि पुणे येथील सत्याग्रहामुळे स्पृश्य हिन्दू व अस्पृश्य वर्ग यांच्यात जी तेढ उत्पन्न झाली होती ती नाशिकच्या होऊ घातलेल्या सत्याग्रहामुळे जास्त वाढेल, अशी इंग्रज सरकारला भीती वाटत होती. त्यामुळे शासनाकडून सतत हस्तक्षेप होत होता. परिणामी एकीकडे सवर्ण हिन्दूंचा विरोध व दुसरीकडून सरकारी अधिकाऱ्यांचा विरोध अशा परिस्थितीत सत्याग्रही सापडले होते. अखेरीस १३ डिसेंबर १९३१ रोजी चळवळ सुरू करण्याचा निर्णय जाहिर करण्यात आला. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाला कर्मठ हिन्दूंकडून तीव्रविरोध झाला. वातावरण अत्यंत प्रक्षुब्ध बनले. परिस्थिती हाताबाहेर जात होती. सवर्ण हिन्दू व अस्पृश्य यांच्यात समेट घडून येत नव्हता. अस्पृश्यांनी नाशिक सत्याग्रहासारखी चळवळ सतत तीन-चार वर्षे एवढया व्यापक प्रमाणात चालविली हे संपूर्ण भारतातील पहिलेच उदाहरण होते.[७३]

परंतु अखेरीस उच्च वर्णीयांच्या आत्यंतिक किंवा दुराग्रही भूमिकेमुळे नाशिक सत्याग्रह स्थगित करावा लागला. तो पुन्हा चालू करण्याची मागणी डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हती. या संदर्भातील त्यांची भूमिका अतिशय वेगळी होती. ३ मार्च १९३४ रोजी लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी नाशिक सत्याग्रहाविषयीची बदललेली भूमिका स्पष्ट केली आहे. मंदिर प्रवेशाची चळवळ करून अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवून देणे, त्याआधारे त्यांना मोक्षप्राप्तीचा मार्ग मोकळा करून देणे या मर्यादित ध्येयाने त्यांनी हे विविध सत्याग्रह घडवून आणले नाहीत तर अस्पृश्य वर्गात आपल्या मानवी हक्कांची जाणीव उत्पन्न व्हावी व हे हक्क प्राप्त करून घेण्यासाठी

प्रस्थापिता विरुध्द सतत लढा देण्याची आत्मशक्ती निर्माण व्हावी, हे त्यांचे व्यापक ध्येय होते. सतत तीन चार वर्षे अतिशय संघटितपणे लढा दिल्याने अस्पृश्यांच्या ठिकाणी तशी शक्ती निर्माण करण्याचे ध्येय साध्य झाले. त्यामुळे त्यापुढची पायरी म्हणजे अस्पृश्यांत शिक्षण प्रसार व राजकीय हक्क यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा निर्माण करणे होय. आणि डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने हे अंतिम ध्येय होते. जर अस्पृश्य समाज शिक्षणाने सुज्ञ व सुसंस्कृत झाला आणि राजकीय हक्कांनी समृध्द झाला तर तो हिन्दु समाजातील एक अविभाज्य घटक म्हणून समान हक्क प्राप्त करुन घेईल आणि असे अंतिम ध्येय पूर्णत: साध्य करण्यासाठी अस्पृश्य समाज आपल्या राजकीय हक्कांविषयी जागृत बनला पाहिजे आणि त्यांच्या प्राप्तीसाठी त्याने संघटितपणे लढा दिला पाहिजे. या व्यापक राजकीय ध्येयावर त्यांनी लक्ष केंद्रित केले व या ध्येयानुसार आपल्या कार्यात त्यांनी नंतरच्या काळात बदल घडवून आणला.

डॉ. आंबेडकरांनी राजकीय सत्तेला समताधिष्ठीत अशा नव्या समाजाच्या निर्मितीचे एक साधन मानले. त्यासाठी अस्पृश्यांना राजकीय सत्तेत योग्य व न्याय्य वाटा असला पाहिजे. यासाठी ते म्हणतात, "अस्पृश्य वर्गीयांनी नुसत्या राजकीय स्थित्यंतरावरच कोरडे समाधान मानू नये. तर राजकीय सत्तेची अशा तऱ्हेची विभागणी झाली पाहिजे. की त्यामुळे समाजात सारा पालट होऊन समाजात वावरणाऱ्या परस्पर बला-बलाच्या शक्तीत फरक पडेल.[७४] त्याच हेतूने त्यांनी अस्पृश्यांना राजकारण हाती घेण्याचे आवाहन केले. सवर्ण पुढाऱ्यांकडून राजकीय सत्तेचा वापर अस्पृश्य वर्गाच्या हितरक्षणासाठी होण्याऐवजी स्वत:च्या हितरक्षणासाठी होतो. आपल्या एका भाषणात ते म्हणतात, "समाजातील धुरंधर नेत्यांनी सामाजिक प्रश्न बाजूस ठेवून राजकारण हाती घेतले. नव्हे

सामाजिक प्रश्न बाजूस टाकल्यामुळे त्यांच्या राजकीय ध्येयाची साध्यता बिकट करून टाकली."[७५] वास्तव हिन्दू समानता देत नसतील तर आपणाच राजकारण हाती घेतले पाहिजे, असे ते सांगतात आणि त्यासाठी खालील चार राजकीय उद्देश्ये त्यांनी समोर ठेवली —

१) राजकीय सत्तेमध्ये अस्पृश्यांना त्यांचा न्याय्य वाटा मिळवून देणे.
२) विभक्त मतदार संघाची मागणी
३) अस्पृश्यांचा स्वत:चा असा राजकीय पक्ष स्थापन करणे
४) शिक्षण व राजकीय चळवळ याद्वारे अस्पृश्यांचे राजकीय प्रबोधन घडवून आणणे.

या चार उद्दिष्टांबरोबरच अस्पृश्यांच्या शैक्षणिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगती साधण्याचा विचारही त्यांनी दूरदृष्टीकोनातून मांडला. त्यादृष्टीने ते म्हणतात, अस्पृश्यांच्या सर्व दु:खावर राजकीय सत्ता हाच एकमेव उपाय नाही. त्यांनी आपली सामाजिक जीवनाची पातळी उंचावण्यातच त्यांचा उध्दार आहे. त्याचप्रमाणे "स्वतंत्र मतदार संघा"संबंधीचा कोणताही करार मोठया प्रमाणावरील सामाजिक समस्या सोडविण्याचा अंतिम उपाय होऊ शकत नाही.[७६]

डॉ. आंबेडकरांनी शैक्षणिक प्रगतीचे महत्त्व ओळखून अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणावर विशेष भर दिला. या वर्गाने आपले आर्थिक मागासलेपण घालविण्यासाठी सरकारी नोकऱ्या मिळविल्या पाहिजेत. त्या मिळविण्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे हे त्यांनी सांगितले. शिक्षणाने समाज प्रगत होतो. त्यात सुधारणा होते यासाठी उच्च शिक्षणाची गरज सांगितली आहे.

शिक्षणाबरोबरच आर्थिक स्वावलंबन व स्वयंपूर्णता याकडे लक्ष दिले आहे. यादृष्टीने त्यांनी शेतीला महत्त्व दिले. अस्पृश्य वर्गाने आर्थिकबाबतीत स्वतंत्र होण्यासाठी शेती व सरकारी नोकरी या दोन साधनांचा उपयोग करून घ्यावा हे त्यांनी सांगितले. या वर्गाच्या परंपरागत व्यवसायामुळे त्याला समाजात मान नाही. त्याला उपेक्षेचे जीवन जगण्याची सवय झाली आहे. त्यांच्या परंपरागत व्यवसायामुळे त्यांना आत्मउन्नतीचा मार्गअनुसरणे शक्य होत नाही. त्यासाठी त्यांनी प्रथम आपल्या आर्थिक स्थितीत बदल केला पाहिजे. म्हणून ते म्हणतात की अस्पृश्य वर्गाने आचार, विचार व उच्चार या त्रिशुध्दीचे अवलंबन करून, पांढरपेशा स्वीकारून व उच्च दर्जाच्या सरकारी नोकऱ्या मिळवून स्वयं-सिध्द बनल्याशिवाय आत्मोध्दार होणार नाही.[७७] स्वावलंबनाने सर्व समाज सुधारत आहे, आपल्या पायावर उभा रहात आहे. त्यामुळे आपला उध्दार आपणच करावा ही स्वोउध्दाराची भावना त्यांनी निर्माण केली. अनेक भाषणांमधून व लेखांमधून शिक्षण प्रसार, आर्थिक स्वावलंबन, अस्पृश्य वर्गातील संघटनात्मक ऐक्य यांचे महत्त्व पटवून दिले.

डॉ. आंबेडकरांनी जातिनिर्मूलनाबरोबरच अस्पृश्यतानिवारण, दलितोध्दार करण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न केले. त्यांना केवळ जातिनिर्मूलन व अस्पृश्यता निवारण याविषयीच तळमळ होती असे नाही तर खऱ्या अर्थाने दलितांचा उध्दार कसा होईल याचाही त्यांनी दूरदृष्टीकोनातून विचार केला. डॉ. आंबेडकरांचे जीवन म्हणजे अस्पृश्य वर्गाला समान हक्क व दर्जा मिळवून देण्यासाठी केलेला अखंड संघर्ष आहे. त्यांना समतेचे हक्क मिळवून द्यायचे असतील तर त्यांना राजकीय सत्तेत न्याय्य वाटा मिळाला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.

समान हक्कप्राप्तीसाठी चालविलेला अस्पृश्यांचा लढा अधिक गतिमान करण्यासाठी स्वतंत्र्य पक्षाची गरज आहे, हे त्यांनी जाणले. सामाजिक राजकीय आणि आर्थिक समतेच्या लढ्यासाठी प्रबळ व प्रभावी पक्ष निर्माण करण्याची गरज ओळखून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष निर्माण करण्याची गरज ओळखून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पार्टी या राजकीय पक्षांची स्थापना केली. १५ ऑगस्ट १९३६ रोजी "टाईम्स ऑफ इंडिया"ला दिलेल्या मुलाखतीत डॉ.आंबेडकर म्हणतात, "देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरितीने भाग घेऊन आपल्या ध्येयास अनुकूल बनविल्याशिवाय कोणत्याही गांजलेल्या वर्गास आपली दुःखे दूर करता येणार नाहीत. यासाठी स्वतंत्र्य मजूर पक्षाची गरज आहे."[७८] या हेतूने त्यांनी या पक्षाची निर्मिती केली. तसेच अत्यंत विचारपूर्वक या पक्षाची आचारसंहिता बनविली. त्याआधारे पक्षाचे आर्थिक, सामाजिक, तसेच शैक्षणिक धोरण स्पष्ट केले. ही आचारसंहिता दलित, अस्पृश्य, कामगार, शेतकरी व कष्टकरी जनतेच्या उन्नतीच्या व उत्कर्षाच्या ध्येयाने प्रेरित झालेली होती.

१९३६ ते ४२ पर्यंत या पक्षाने अस्पृश्य वर्गाच्या व मजुरांच्या उन्नतीसाठी व हक्कप्राप्तीसाठी महत्त्वाची कामगिरी पार पाडली. शेतकरी, कामगार यांचे प्रश्न व हक्क यासाठी विधिमंडळात व विधिमंडळाबाहेरही सतत लढा दिला. या सर्व घटकांना संघटित करण्यासाठी व त्यांच्यात हक्काविषयी जाणीव निर्माण केली.

तसेच एप्रिल १९४२ मध्ये अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन अस्तित्वात आले. या फेडरेशनच्या पहिल्याच ठरावात त्याच्या निर्मिती मागील उद्देश स्पष्ट केला होता. तोअसा-अस्पृश्यांचा सर्वांगिण उध्दार

करण्याच्या हेतूने समाजाची राजकीय चळवळ चालविण्यासाठी भारतव्यापी अशा मध्यवर्ती राजकीय संघटनेची फार जरुरी आहे. त्यासाठी अखिल भारतीय राजकीय संघटनेची आवश्यकता आहे.[७९] तसेच या फेडरेशनचे ध्येय निश्चित करणाऱ्या कलमात असे म्हटले होते - हिन्दुस्थानच्या राष्ट्रीय जीवनात अस्पृश्य वर्गाला खास वेगळा दर्जा मिळवून देणे आणि त्या वर्गाच्या गरजा, संख्या व महत्त्व या कारणामुळे त्यांच्या हक्काचे असलेले राजकीय, सामाजिक व आर्थिक हक्क मिळवून देणे.

थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेला शह देण्यासाठी अनेक मार्ग व उपायांचा प्रत्यक्ष अवलंब केला. सर्व बाजूंनी व सर्व साधनांच्या साहाय्याने ते जातिव्यवस्थेच्या विषम स्वरूपावर सतत टीका करीत राहिले. त्यांच्या प्रयत्नांमध्ये काही उणीवा, कमतरता राहून गेल्या. राजकीय हक्क प्राप्तीच्या चळवळीला व्यापक अधिष्ठान देण्याचा व सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा सर्वांगानी ती चळवळ समाजपरिवर्तनाच्या दिशेने प्रगत व्हावी, यादृष्टीने त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. तसेच न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर अधिष्ठीत अशा समाजाची रचना निर्माण होण्याची शक्यता जसजशी नष्ट होत चालली तेव्हा त्यांनी मानवी मूल्यांवर अधिष्ठीत अशा बौध्द धर्माची दीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यातून व्यापक सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी त्यांनी धर्मांतराचा मार्ग स्वीकारला. तसेच प्रस्थापित हिंदु धर्मात जातिसंस्था नष्ट होत नाही हे लक्षात आल्यानंतरच त्यांनी धर्मांतराचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या या निर्णयावर अनेक आक्षेप घेतले गेले. त्यांनी हा निर्णय राजकीय हेतूने घेतलेला नाही. त्याचप्रमाणे त्यामागे कोणतीही आध्यात्मिक प्रेरणा नाही. या निर्णया-मुळे आर्थिक प्रश्न सुटणार नाहीत. धर्मान्तर हे राष्ट्रांतर आहे असे आक्षेप घेतले गेले.[८०] परंतु त्यांनी केवळ पराभूत भावनेतून धर्मान्तराचा निर्णय घेतलेला नाही.

....

## प्रकरण तिसरे

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार

१. मराठी विश्वकोश खंड-१. — पृष्ठ कृ.८७७ व ८७८

२. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.कृ. १६

३. फडके भालचंद्र - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.कृ. २९ व ३२

४. उक्त — पृ.कृ. ३५

५. उक्त — पृ.कृ. ०५

६. उक्त — पृ.कृ. ०६

७. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.कृ. ७०

८. उक्त — पृ.कृ. ४७

९. फडके भालचंद्र - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.कृ. २०

१०. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.कृ. ७६

११. उक्त — पृ.कृ. ९२

१२. मराठी विश्वकोश खंड - १ — पृ.कृ.८७८

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१३• मराठी विश्वकोश खंड – १ पृ•क्र• ८७८

१४• उक्त पृ•क्र• ८७८

१५• मून वसंत (अनु) जातिसंस्थेचे उच्चाटन पृ•क्र• ४८

१६• उक्त पृ•क्र• ५३

१७• उक्त पृ•क्र• ६०

१८• उक्त पृ•क्र• ६३

१९• उक्त पृ•क्र• ६२

२०• उक्त पृ•क्र• ४३

२१• उक्त पृ•क्र• ४४

२२• उक्त पृ•क्र• ६२

२३• उक्त पृ•क्र• ६०

२४• डॉ•आंबेडकर (अनु•) भारतातील जाती त्यांची यंत्रणा, उत्पत्ती व प्रसार पृ•क्र• ४

२५• उक्त पृ•क्र• ५

२६• उक्त पृ•क्र• ७

२७. डा.आंबेडकर (अनु.) भारतातील जाती त्यांची घडण, उत्पत्ती व प्रसार — पृ.क्र. ८

२८. उक्त — पृ.क्र. ९ व १०

२९. उक्त — पृ.क्र. २१

३०. उक्त — पृ.क्र. २२

३१. उक्त — पृ.क्र. २३

३२. उक्त — पृ.क्र. २३

३३. उक्त — पृ.क्र. २६

३४. उक्त — पृ.क्र. २७

३५. उक्त — पृ.क्र. २७

३६. उक्त — पृ.क्र. २७

३७. उक्त — पृ.क्र. ३०

३८. उक्त — पृ.क्र. ३४

३९. मून वसंत (संपा.) जातिसंस्थेचे उच्चाटन — पृ.क्र. ७७

४०. उक्त — पृ.क्र.८०

४१. मून वसंत (संपा.)जातिसंस्थेचे उच्चाटन पृ.क्र.८०

४२. उक्त पृ.क्र. ८१

४३. उक्त पृ.क्र. ९५

४४. उक्त पृ.क्र. ६८

४५. उक्त पृ.क्र. ६९

४६. उक्त पृ.क्र. ६४

४७. उक्त पृ.क्र. ६४ व ६५

४८. उक्त पृ.क्र. ८४

४९. उक्त पृ.क्र. ८४

५०. उक्त पृ.क्र. ८५

५१. उक्त पृ.क्र. ८५

५२. उक्त पृ.क्र. ८६

५३. उक्त पृ.क्र. ८६

५४. उक्त पृ.क्र. ८७

५५. मून वसंत (संपा) जातिसंस्थेचे उच्चाटन पृ.क्र. ९६,९७ व ९८.

५६. उक्त उक्त पृ.क्र. ९८ ब

५७. उक्त पृ.क्र. ९८ ड

५८. उक्त पृ.क्र. १८०

५९. उक्त पृ.क्र. १०० व १०१

६०. उक्त पृ.क्र. १०१

६१. उक्त पृ.क्र. १००

६२. उक्त पृ.क्र. १०१

६३. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर पृ.क्र. २३६

६४. खैरमोडे चां.भ. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र खंड १. पृ.क्र. १[illegible]

६५. उक्त उक्त पृ.क्र. ५४

६६. उक्त पृ.क्र.१६ व १७

६७. डॉ.फडके भालचंद्र,डॉ.बाबासाहेब आंबेडकर पृ.क्र. ९७.

६८. खैरमोडे चां.भ.,डॉ.भीमराव रामजी आंबेडकर
यांचे चरित्र खंड १ पृ.क्र. ११

६९. उक्त पृ.क्र. ७६ व ७७

७०. उक्त पृ.क्र. २८७

७१. उक्त पृ.क्र. २९०

७२. उक्त पृ.क्र. ११२

७३. उक्त पृ.क्र. १८०

७४. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर पृ.क्र. १५२

७५. गांजरे मा.फ.(सं.) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची
भाषणे खंड - २ पृ.क्र. ९

७६. उक्त पृ.क्र. ७

७७. खैरमोडे चां.भ. - डॉ.भीमराव रामजी आंबेडकर
चरित्र खंड ३ पृ.क्र. १५

७८. फडके भालचंद्र - डॉ.बाबासाहेब आंबेडकर पृ.क्र.१९१ व १९२

७९. उक्त पृ.क्र. २०४

८०. फडके भालचंद्र - डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य - पृ.क्र. ४५१.

# प्रकरण चौथे

## डॉ. आंबेडकर व बॅ. वि.दा. सावरकर यांच्या जातिनिर्मूलन विषयक विचारांचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास

## प्रकरण चौथे

## डॉ. आंबेडकर व बॅ. वि. दा. सावरकर यांच्या जातिनिर्मूलन विषयक विचारांचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास

### प्रास्ताविक:

डॉ. आंबेडकर व सावरकर यांच्या जातिनिर्मूलन विषयक विचारांचा चिकित्सक व तुलनात्मक अभ्यास करताना त्यात काही साम्यदर्शक तर काही भेददर्शक तत्त्वे आढळून येतात. समाज सुधारणा व जातिप्रथा निर्मूलन यादृष्टीने दोघांनी मांडलेले विचार समाजसुधारणेच्या व धर्म सुधारणेच्या आंदोलनाला प्रेरक व मार्गदर्शक ठरले आहेत. आंबेडकर व सावरकर यांच्या जातिनिर्मूलनाविषयीच्या भूमिकेत काही प्रमाणात तफावत असली तरी तिच्या निर्मूलनाच्या आवश्यकतेविषयीची त्यांची भूमिका अनुकूल होती. सावरकरांनी संघटित हिन्दू समाज, तसेच एकात्म आणि समर्थ हिन्दू राष्ट्र निर्माण करण्याच्या मार्गातील एक प्रमुख समस्या या भूमिकेतून जातिसंस्था व जातिप्रथा यांचा विचार केला आहे. तर मानवी हक्क, व्यक्तीस्वातंत्र्य, समताधिष्ठीत समाज रचना यादृष्टीने जातिसंस्था हानिकारक आहे आणि व्यक्तीच्या व्यक्तिगत तसेच सर्व प्रकारच्या विकासाच्या मार्गातील जातिसंस्था हा मोठा अडसर आहे. अशी आंबेडकरांची भूमिका आहे. जन्मत: सर्व व्यक्ती समान आहेत. त्यांच्यातील भेदाभेद हे मानीव व कृत्रिम आहेत. ते नष्ट करून समताधिष्ठीत समाजाची निर्मिती केली पाहिजे, असे आंबेडकरांना वाटते. तर सर्व हिन्दू तेवढे समान आहेत. त्यासाठी हिन्दूमधील भेदभाव नष्ट करून एकात्म व संघटित हिन्दू राष्ट्र निर्माण झाले पाहिजे, असे सावरकरांना वाटले होते. हेच प्रमुख विचारसूत्र त्यांच्या जातिनिर्मूलन

विषयक तत्वज्ञानात आढळून येते. हे विचारसूत्र केंद्रीभूत असून त्या अनुषंगाने त्यांचे सामाजिक, राजकीय विचार व्यक्त झालेले आहेत. थोडक्यात जात्यतीत जाऊन अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी जातिविरहीत अशा नव्या समाजरचनेची कल्पना आंबेडकर मांडतात तर सावरकरांचे तत्त्वज्ञान केवळ हिंन्दूंच्या कल्याणाचे व ऐक्याचे तत्त्वज्ञान सांगतात.

जातिसंस्थेची सामर्थ्यस्थाने: डॉ. आंबेडकर व बॅ. सावरकर यांनी जातिसंस्थेची निर्मिती, तिचे प्राचीन काळातील स्वरुप, नंतरच्या काळात बदललेले स्वरुप, तिचे दुष्परिणाम, तिच्या निर्मूलनाची आवश्यकता या मुद्दयांच्याआधारे जातिमीमांसा केलेली आहे. याआधारे तिची सामर्थ्यस्थानेही स्पष्ट केली आहेत. सावरकरांच्या मते, जातिव्यवस्था हे वर्णव्यवस्थेचे भ्रष्ट स्वरुप आहे. सुरुवातीच्या काळात हिन्दू समाजाचे एकात्म स्वरुप स्पष्ट करण्याच्या कामात जातिसंस्थेने महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. परंतु त्यानंतर ती विकृत बनत गेली. अशी विकृत आणि भ्रष्ट जातिसंस्था टिकवून ठेवण्याच्या कामी अनेक घटकांनी मदत केली आहे. यादृष्टीने त्यांनी पहिला आक्षेप धर्मग्रंथ व शब्दप्रामाण्यावर घेतला आहे. प्राचीन हिन्दू धर्मग्रंथ, हे जातिसंस्थेचे एक सामर्थ्यस्थान आहे, असे सावरकरांना वाटते. धर्मग्रंथ, वेद यावरील अतिरिक्त व अनाठायी श्रध्देमुळे मानीव जातिप्रथा व सामाजिक विषमता निर्माण झाली. जाती व वर्णपध्दतीला धर्मग्रंथांचा आधार आहे या समजातून जातिसंस्था अधिक बंदिस्त व विकृत बनत गेली.

धर्मग्रंथांप्रमाणेच अंधश्रध्दा, भ्रामक समजूती, उच्चनीचतेची भावना हे देखील जातिसंस्थेची एक सामर्थ्यवान आहे. रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी

यासारख्या भ्रामक व घातक समजुतींनी जातिसंस्था कायम टिकून राहिली. सावरकरांच्या मते, सप्तबंदी हे जातिसंस्था वर्षानुवर्षे कायम टिकून राहण्याच्या दृष्टीने कारणीभूत झालेले सर्वात प्रभावी असे शक्तीस्थान आहे. या सप्तबंदीने जातिसंस्थेचे स्वरूप वर्षानुवर्षे चिरेबंदी ठेवले आहे. या बेड्यांनी पूर्वीचा एकात्म व संघटित समाज अनेक जाती, उपजातींत विभागला. अनेक वर्षांचा काळ लोटला, धार्मिक आक्रमणे झाली. परंतु हिन्दू समाजाचे जातिबध्द स्वरूप कायम राहिले.

जातिधर्म हा सनातन धर्म आहे या भ्रामक समजुतीमुळे अनिष्ट अशा जातिप्रथेचे वर्षानुवर्षे काटेकोरपणे पालन केले जात आहे. जातिप्रथेला अपरिवर्तनीय, शाश्वत धर्म मानल्यामुळे ती अधिकाधिक परिदृढ बनत गेली. जातिप्रथेला धर्माचे अधिष्ठान असून ती अपरिवर्तनीय आहे. तिचे पालन प्रत्येक हिन्दू धर्मियाने केले पाहिजे अशा समजुतीच्या घोटाळ्यामुळे जातिप्रथा टिकून राहिली आहे असे बॅ. सावरकरांना वाटते.

या धर्मग्रंथांना प्रमाणमानून केला जाणारा अचारही जातिसंस्था टिकून राहण्यास व जातिसंस्था अधिकाधिक समर्थ बनण्यास कारणीभूत ठरला आहे, असे सावरकरांना वाटते. वास्तविक हे सर्व आचार केवळ अंधआचार किंवा मानीव व पोथीजात आहेत. परंतु या मानीव आचारांचे स्तोम निर्माण झाल्यामुळे जातिप्रथेला जन्मनिष्ठ स्वरूप प्राप्त झाले आणि तिने आपले पूर्वीचे लवचिक, गुणकर्म निष्ठ स्वरूप गमावले. याच मानीव आचारांमुळे हिन्दू समाजात सप्तदोष निर्माण झाले. ते अनेक वर्षांपर्यंत टिकून राहिले. त्यामुळे हिन्दू समाजाची उत्तरोत्तर अधोगती होत गेली.

डॉ. आंबेडकरांनी तात्त्विक व व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टीने जातिप्रथा ही एक व्यापक समस्या मानली आहे. त्यादृष्टीने त्यांनी जातिव्यवस्थेचे स्वरूप व तिची सामर्थ्यस्थाने स्पष्ट केली आहेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जातिबाह्य भोजनबंदी व जात्यंतर्गत विवाह ही डॉ. आंबेडकरांच्या मते दोन प्रमुख अशी जातिप्रथेची सामर्थ्यस्थाने आहेत. या दोन रूढींमुळे जातिसंस्थेचे स्वयंमर्यादित व वर्गीय स्वरूप हजारो वर्षे टिकून राहिले आहे. त्याचप्रमाणे श्रुतिस्मृति पुराणे, धर्मग्रंथांच्या आज्ञा ब्राह्मण तसेच पुरोहित वर्गाचे वर्चस्व यामुळे देखील जातिप्रथा कायम राहिली असे डॉ. आंबेडकरांना वाटते. या धर्मग्रंथांनी हिन्दू समाजाची मनोधारणा जातिनिष्ठ बनविली. त्यादृष्टीने त्यांनी मनुस्मृति सारख्या हिन्दू धर्मग्रंथाला विरोध केला आहे. डॉ. आंबेडकरांना जातिव्यवस्थेवर आधारलेला हिन्दू समाज व त्याची रचना विकृत वाटते. कारण त्यांच्या मते, ही विकृती केवळ वैचारिक किंवा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातही निर्माण झाली आहे.

## सावरकरकृत जातिमीमांसा:

सावरकरांची जातिमीमांसा पारंपारिक व तत्कालीन जातिमीमांसेपेक्षा बरीचशी भिन्न व वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. त्यांच्या एकंदर विचारांमध्ये कठोर तार्किक शक्ती एकवटलेली आहे. त्यांच्या विचारांवर पाश्चात्य विचारांचा मोठा प्रभाव पडलेला आहे, हे लक्षात येते. त्यामुळे त्यांच्याही विचारांना व्यापक व भक्कम असे वैज्ञानिक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. उत्क्रांतिवाद, विज्ञानवाद, उपयुक्ततावाद, बुध्दीवाद यांचा स्वीकार हा पाश्चात्य विचारांच्या प्रभावाचा दृश्य परिणाम आहे. उत्क्रांतीवादाच्या सिध्दान्ताप्रमाणे जे दृश्य विश्व किंवा अस्तित्व आहे त्याचे स्वरूप प्रारंभी साधे, एकविध व अस्फुट असते. परंतु त्यातून ज्याच्यात अनेक भिन्न वैशिष्टये सुसंघटितपणे व सुरचितपणे, एकात्मपणे वसत आहेत असे मिश्र, अनेकविध, प्रस्फुट असे स्वरूप विकसित होते.[१] या नैसर्गिक नियमानुसार

ही उत्क्रांती नेहमी जीवन कलह जे समर्थ व उच्चतम आहे ते टिकून राहते या नियमाला अनुसरून होते. मानवी समाजाच्या बाबतीतही हाच नियम लागू होतो. मानवी समाजात ज्या परस्पर विरोधी धारणा किंवा कल्पना असतात, आचार असतात, त्यांच्यात संघर्ष होतो. ज्या अनुकूल धारणा किंवा कल्पना असतात त्या या संघर्षात टिकून राहतात. त्यांचा स्वीकार समाजाकडून केला जातो. प्रतिकूल धारणा हळूहळू नाश पावतात. त्याआधारे जास्तीतजास्त सुखी, समृध्द जीवन जगणारा मानवी समाज अस्तित्वात येणार आहे - हे त्यांच्या विचारांचे[२] मुख्य सूत्र आहे. हेच सूत्र मध्यवर्ती मानून त्यांची जातिमीमांसा किंवा जातिनिर्मूलना-विषयीचे विचार व्यक्त झालेले आहेत.

सावरकरांच्या मते, हिन्दू समाजाचा विकास किंवा त्याचे परिवर्तन उत्क्रांतीवादाच्या नैसर्गिक नियमानुसार होऊ शकले नाही. या परिवर्तना-च्या मार्गातील जातिप्रथा हा मोठा अडसर होता. जातिप्रथेने हिन्दु समाजाला गतिहीन, स्थितप्रज्ञ बनविले. हिन्दू समाज जातिप्रथेचा गुलाम बनला. धर्मग्रंथ शब्दप्रामाण्य याला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. या धर्मग्रंथामधून मानवी जीवनाचे सारे श्रेय निश्चित करणारी आणि ते साधणारी प्रमाण अशी जीवनपध्दती व्यक्ती झाली. तिला अनुसरून जाले तर जीवनाला एक भव्य, उदात्त अर्थ प्राप्त होतो, असा समज निर्माण झाला. या समजातून हिन्दू समाजाची अधोगती सुरु झाली. जातिप्रथेची अत्यंत घातक रूढी निर्माण होऊन जातिबध्द हिन्दू समाजात व्यक्तीची अस्मिता जातीशी बांधली गेली.

सावरकरांच्या जातिमीमांसेला हिन्दुत्वाचा आशय प्राप्त झालेला आहे. त्यांचे एकंदर जातिविषयक विचार हिन्दू राष्ट्र समर्थ व दिग्विजयी व्हावे या ईर्षेने व्यक्त झालेला आहेत. हिन्दू राष्ट्राची हजारो जाती-

उपजातींमध्ये व स्पृश्यास्पृश्यतेमध्ये विभागणी झाली. त्यामुळे त्याचा शक्तिपात झाला. या एका कारणामुळे हे राष्ट्र परक्या लोकांकडून सतत पराभूत होत राहिले. अशी हिन्दू समाजाच्या ऱ्हासाची कारणमीमांसा ते एका बाजूने करतात. त्यासाठी प्रचलित जातिभेदाचे उच्चाटन करण्याची आवश्यकता त्यांनी सांगितली. तसेच पोथीजात जातिभेद व त्याचे समर्थन करणाऱ्या उच्चवर्णीय सनातन्यांवर त्यांनी कठोर टीकाही केली. हिन्दू समाजातील मानीव जातिभेद नष्ट होऊन ते बलाढ्य बनावे अशी त्यांची इच्छा होती. तर दुसरीकडे हिन्दू समाज व राष्ट्र आज्जेते होण्यासाठी त्यात सतत श्रेष्ठ गुणांचा परिपोष होत राहिला पाहिजे आणि हे गुण आनुवंशिक असल्यामुळे त्यांच्या वृध्दीसाठी सुजननाची व "इतर घटक" अनुकूल राखण्याच्या दृष्टीने आवश्यक ते सर्व निर्बंध जारी करण्याची गरज त्यांना भासत होती. त्यामुळे एकाच वेळी जातिप्रथा उच्छेदण्याचा विचार आग्रहाने मांडत असतानाच दुसरीकडे ते नव्या जातिभेदाच्या निर्मितीची कल्पनाही मांडत होते.[3] थोडक्यात "हिन्दू" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाची जडणघडण जातिभेद व चातुर्वर्ण्य यांनी ओतप्रोत कशी आहे आणि ते या समाजाच्या रचनेचे, जीवनाचे प्राणतत्त्व कसे आहे याचे विवेचन त्यांनी केले आहे.

## आंबेडकृत जातिमीमांसा:

डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातिसंस्थेबद्दल व वर्णव्यवस्थेबद्दल अतिशय मूलगामी स्वरूपाचे लेखन केले आहे. अनेक ग्रंथांच्या व निबंधांच्या माध्यमातून त्यांनी जातिप्रथेचा शास्त्रीय व चिकित्सक विचार मांडला आहे. त्या सर्व विचारांचा अभ्यास व तुलना येथे शक्य नाही. तरी त्यांचे जातिप्रथा निर्मूलनाविषयीचे विचार समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

डॉ. आंबेडकरांनी तात्विक आणि व्यावहारिक अशा दोन्ही पातळींवरून भारतातील जातिप्रथेचा शास्त्रीय दृष्टीकोनातून विचार केला आहे. आंबेडकरांच्या मते हिन्दू समाज हा जर केवळ परस्परांपासून भिन्न अशा जातींचा समूह असता तर भारतातील जातिसमस्येचे स्पष्टीकरण करणे अवघड झाले आहे. परंतु आधीच एकसंघ असलेल्या समाजाचा जात हा एक घटक असल्याने जातिसंस्थेच्या उगमाचे विश्लेषण म्हणजे मूळातल्या एकसंघ समाजाच्या विघटनाच्या प्रक्रियेचे विश्लेषण असल्याने ते करणे अतिशय अवघड आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, "जात ही जाति-व्यवस्थेवर आधारलेल्या संपूर्ण समाजाशी निश्चित स्वरूपाचे संबंध असणारी व समाजाच्या अंतर्गत एका गटाच्या स्वरूपात अस्तित्वात असणारी गोष्ट आहे."[४]

जातिप्रथेच्या निर्मितीचा विचार मांडताना डॉ. आंबेडकर असे मत प्रतिपादन करतात की जातिसंस्था ही एक कृत्रिम संस्था आहे. कारण भारतीय इतिहासात वर्गाला बंदिस्त करण्यासाठी जी कृत्रिम साधने वापरली गेली त्यातुन जातिसंस्था निर्माण झाली. त्यादृष्टीने त्यांनी जातिसंस्थेचा उगम व प्रसार हे दोन भिन्न प्रश्न मानले आहेत. जाति-संस्थेच्या उत्पत्तीविषयी त्यांनी अत्यंत बुध्दीवादी विचार मांडला आहे. त्यांच्या मते, मनुस्मृतित जातिसंस्थेचे समर्थन आहे. परंतु त्याचे जनकत्व मनुला देता येणार नाही. त्यासाठी जातिसंस्थेच्या निर्मितीचा विचार प्राचीन धर्मग्रंथांच्या कोषातून बाहेर पडून घ्यावा लागेल. तर तिच्या निर्मितीचे मूळ ऐतिहासिक कालखंडातील भौतिक परिस्थितीत शोधावे लागते.

जातिसंस्थेची निर्मिती, तिचे अस्तित्व व विकृत स्वरूप याचे मूळ धर्मात आहे. जातींना धर्माचे बळकट अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.

त्यामुळेच जातिसंस्थेला बंदिस्त स्वरूपही प्राप्त झाले. यासाठी त्यांनी हिन्दू धर्माचे व धर्मग्रंथांचे कठोर परिक्षण करून काळानुसार बदल करण्याची आवश्यकता सांगितली. त्यांच्यामते बदल हा निसर्गाचा नियम आहे. प्राप्त परिस्थितीची आव्हाने स्वीकारण्यासाठी धर्म गतीशील ठेवणे गरजेचे आहे, हे महत्त्वाचे तत्त्व त्यांनी सांगितले.

जगात प्रत्येक धर्माने सबल एकसंध समाज निर्माण करण्याचे श्रेय मिळविले आहे. याउलट हिन्दू धर्म "एकात्म हिन्दू समाज" कधीच निर्माण करु शकला नाही. समाजच काय एक "संघ" देखील निर्माण करु शकला नाही. तो शत्रूच्या विरोधात एकजुटीने लढू शकला नाही. त्यामुळे हिन्दूंचा इतिहास हा अखंड पराभवाचा व पारतंत्र्याचा इतिहास आहे. हिन्दू धर्माने हिन्दूंना सतत दास्यत्व व गुलामगिरीचे जीवन दिले. म्हणून ते म्हणतात की, "हिन्दू धर्माने व त्याच्या समाजव्यवस्थेने असंख्य शूद्रांचे जीवन मातीमोल केले असे नाही तर सर्वच हिन्दूंचे व पर्यायाने हिन्दूस्थानचे जीवन मातीमोल केले आहे.[५]

डॉ. आंबेडकर जातिव्यवस्थेची चिकित्सा करताना हिन्दू समाजातील उच्च व खालच्या जातींच्या स्थितीचे व दर्जाचे स्पष्टीकरण करतात ते म्हणतात, हिन्दू लोकांचे शास्त्रापरत्वे चार, पण रूढीपरत्वे पाच वर्ण आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र. वर्णव्यवस्था हा हिन्दू धर्माच्या यमनियमाचा पहिला नियम आहे. त्याच धर्माच्या यमनियमाचा दुसरा नियम असा की हे वर्ण असमान दर्जाचे आहेत. त्यांची वरपासून खालपर्यंत दर्जाची एक उतरंड आहे. नियमानुसार त्यांचे दर्जे ठरून गेले आहेत असेच नव्हे तर कोण कोणत्या दर्जाचा आहे हे ओळखता यावे म्हणून प्रत्येक वर्णाची मर्यादा ठरवून दिलेली आहे. हिन्दू धर्मात बेटीबंदी रोटीबंदी, भेटीबंदी या परस्परांतील नुसत्या सहवासाच्या मर्यादा आहेत,

असा सर्वसाधारण समज आहे. परंतु हा समज अपुरा आहे. कारण या बंदी म्हणजे सहवासाच्या मर्यादा तर आहेतच पण त्या असमान दर्जाच्या लोकांना त्यांचा दर्जा कोणता हे दर्शविण्यासाठी घातलेल्या आहेत.[६] अर्थात या सहवासाच्या मर्यादा म्हणजे असमानतेची चिन्हे आहेत. ज्या वर्गाला यापैकी कोणत्याच बंदीची मर्यादा नाही तो वर्ग सर्वात श्रेष्ठ समजला जातो व ज्या वर्गाला सर्वप्रकारच्या बंदीच्या बेड्यांनी बांधून टाकले आहे त्या वर्गाचा दर्जा सर्वात हीन मानला जातो. हे पंचबंध कायम राहण्यासाठी जी एवढी धडपड करण्यात येते ती एवढ्याचसाठी की, तसे झाल्याने धर्माने ठरवून दिलेली असमानता मोडून तिच्याऐवजी समता प्रस्थापित होईल.

अशाप्रकारे विषमतेच्या पायावर उभी असलेली हिन्दू समाजाची चातुर्वर्ण्यव्यवस्था एका बाजूने हिन्दू समाजातील विषमता व्यक्तीचा विकास खुंटवून समाजाला खुरटा करते तर दुसऱ्या बाजूने हीच विषमता व्यक्तीत साठवून ठेवलेल्या शक्तीचा समाजास योग्य तो उपयोग करु देत नाही.[७] अशा प्रकारे दोन्ही बाजूंनी चातुर्वर्ण्याने विस्कळीत झालेला हिन्दू समाजास ही असमानता दुर्बल करीत आहे.

सावरकरांनी सुचविलेले जातिनिर्मूलनविषयक उपाय:

सावरकरांची जातिमीमांसा केवळ हिन्दू समाजातील दोषदर्शनाच्या मर्यादित ध्येयाने व्यक्त झालेली नाही. तर जातिप्रथेसारखी अत्यंत घातक रुढी नष्ट करुन हिन्दू राष्ट्राचे ऐक्य व सामर्थ्य वाढविण्याच्या राष्ट्रीय ध्येयाने त्यांचे जातिनिर्मूलन विषयक विचार व्यक्त झालेले आहेत. जातिप्रथा निर्मूलन व संघटित हिन्दू राष्ट्राची निर्मिती ही त्यांची दोन

व्यापक ध्येये होती. या ध्येयांच्या पूर्तीसाठी त्यांनी जातिनिर्मूलनाचे उपाय सांगितले आहेत. त्यांच्या जातिनिर्मूलनविषयक उपायांना देखील हिन्दुत्वाचा आशय प्राप्त झाला आहे. त्यादृष्टीने त्यांनी सप्तबंदी तोडून परस्परातील भेदभावना नष्ट करणे, जातिजातीतील जात्यंहकार नष्ट करून हिन्दुत्वाच्या व्यापक तत्त्वावर समाजाची रचना करणे व जन्मजात चातुर्वर्ण्यपध्दतीऐवजी गुण व कर्मनिष्ठ अशा चातुर्वर्ण्यरचनेचा स्वीकार करणे असे मार्ग सांगितले आहेत.

सावरकरांनी जातिभेदाधिष्ठीत "सप्तबंदी" आणि उच्चनीचता, त्यांची कालबाह्यता आणि अवैज्ञानिकता स्पष्ट केली आहे. "हिन्दू राष्ट्रा"च्या ऐक्य व सामर्थ्याच्यादृष्टीने जातिभेद मोडण्याची निकड नजरेस आणून दिली आणि जातिभेद, विशेषत: अस्पृश्यता कशी नष्ट होऊ शकेल याचा मार्गही चोखाळून दाखविला आहे.[८] या संदर्भात सावरकर म्हणतात, बदलत्या काळानुसार "सप्तबंधाने" किंवा जातिबंधाने शिथिल होत गेली. व्यवसायबंदी ही बरीच शिथिल झाली तसेच स्पर्शबंदी व रोटीबंदीही पूर्वीइतकी कठोर राहिली नाही. म्हणूनच घराबाहेर आणि घरामध्येही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत काही निवडक धार्मिक, सांस्कृतिक प्रसंगी उच्चनीचता व स्पृश्यास्पृश्यता पाळण्याचे लोकांनी सोडून द्यावे, असा सावरकरांच्या कार्याचा मुख्य भाग होता.[९] या भूमिकेमुळे स्पर्शबंदी व रोटीबंदी शिथिल होणार होती. तसेच प्रत्येक व्यक्ती आपल्या जातीचा अभिमान बाळगू शकणार होती. इतकेच नव्हे तर श्रेष्ठ-कनिष्ठ भाव कायम राखण्यातही काहीच अडचण पडणार नव्हती.[१०] काही गुण व काही कर्मे श्रेष्ठ असतात अशी सावरकरांची ठाम समजूत होती. असे गुण अनुवंशाने प्राप्त होतात आणि सुजननाद्वारे वाढविता येतात,[११] अशीही त्यांची समजूत होती. म्हणूनच त्यांनी जातिविरहीत अशा समाजरचनेची कल्पना

कधीच मांडली नाही. तर त्याऐवजी "जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाचा उध्दार" हा उपाय त्यांनी सांगितला आहे.

"जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाचा उध्दार" करण्यासाठी ज्या धर्मग्रंथांनी हिन्दूंना मानसिक गुलामगिरी दिली त्या धर्मग्रंथांचे प्रामाण्य नष्ट केले पाहिजे, असे सावरकरांना वाटते. हिन्दू धर्मग्रंथ ईश्वर-निर्मित,मानवनिर्मित आहेत, ही जाणीव झाल्यास जातिभेदाच्या तटबंदी दूर करता येतील, असे त्यांना वाटते. त्यासाठी त्यांनी धर्मग्रंथातील प्रत्येक गोष्ट बुध्दीवाद व शास्त्रीय दृष्टीकोनातून पारखून घेण्यास व मगच तिचा स्वीकार करण्यास सांगितले आहे. प्राचीन ग्रंथांनुसार वर्ण-व्यवस्था निर्माण झाली. वर्णव्यवस्थेतून जातिसंस्थेची निर्मिती झाली म्हणून ती चांगली आहे, असे मानण्यास ते तयार नाहीत. त्यांच्यामते जातिसंस्था हा वर्णसंस्थेचा मूर्तिमान उच्छेद आहे. जातिव्यवस्था हे वर्ण-व्यवस्थेचे भ्रष्ट किंवा विकृत स्वरुप आहे. त्यामुळे मूळच्या गुण व कर्मनिष्ठ चातुर्वर्ण्य पध्दतीचे पुनरुज्जीवन करण्याचा विचार त्यांनी मांडला आहे. जातीजातीतील उच्चनीचतेची भावना नष्ट करुन त्यांच्यात "आपण सर्व हिन्दू आहोत" अशी धारणा निर्माण केली पाहिजे. त्यासाठी हिन्दू समाजाचे सर्व घटक "हिन्दुत्वा"च्या एका समान सूत्रात बांधण्याचा उपाय त्यांनी सांगितला आहे. हिन्दू समाजातील हजारो जातींचे वेगळे अस्तितत्व पुसले जाऊन त्या साऱ्या एकाच "हिन्दू जातीत" विलीन व्हाव्यात[१२] असा त्यांचा प्रयत्न होता.

**डॉ. आंबेडकर यांनी सांगितलेले जातिनिर्मूलनाचे उपाय:**

डॉ. आंबेडकरांनी जातिप्रथा निर्मूलनाच्या मुख्य उद्देशाने जातिव्यवस्थेची कठोर मीमांसा केली आहे. त्यादृष्टीने त्यांनी तिच्या निर्मूलनाचे काही

व्यावहारिक उपाय सांगितले आहेत. जातिसंस्थेचे उच्चाटन करण्यासाठी प्रथम पोटजाती व जातींचे उच्चाटन करणे, सर्व समाज एकवर्णी करणे व अशा समाजाची गुण व कर्म याआधारे श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार चार वर्णात विभागणी करणे हा जातिप्रथा निर्मूलनाचा मार्ग त्यांना मान्य नाही. कारण उच्च वर्णीय आपले अधिकार व दर्जा गमावण्यास व त्याचबरोबर खालच्या वर्णाला समानतेचे अधिकार देण्यास कधीच तयार होणार नाहीत. वर्णा-वर्णातील संबंध श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या तत्त्वावर आधिष्ठीत रहावेत, असे उच्च वर्णियांना वाटणे, यातच चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे सारे मर्म आहे. याच दृष्टीने विचार करुन आंबेडकरांनी जातिनिर्मूलनाचे उपाय किंवा मार्ग सांगितले आहेत.

यासंदर्भात ते म्हणतात, की खालच्या वर्णांचे सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील सारे हक्क व अधिकार ब्राह्मण वर्णाने दडपून टाकले आहेत. त्याने स्वतःला वर्णगुरुच्या ठिकाणी मानून हिन्दू समाजातील ब्राह्मणेतर वर्णांना गुलाम करुन ठेवले आहे. म्हणून ब्राह्मणी धर्म नष्ट करणे हा जातिनिर्मूलनाचा मुख्य उपाय आहे. ब्राह्मणी वर्चस्व नष्ट केले तरच अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट होणार आहे,[१३] अशी त्यांची समजूत आहे. या ब्राह्मणी वर्चस्वामुळे वर्णव्यवस्था बळकटपणे टिकून राहिली आहे. तिच्याकडून खालच्या वर्णांवर अनेक मर्यादा, बंधने लादली गेली. यासाठी "बेटीबंदीपासून भेटीबंदीपर्यंत वर्णाश्रमाच्या चौकटीचे खिळे उडवून हिन्दू समाज एकवर्णी केला पाहिजे. त्याशिवाय अस्पृश्यताही जाणार नाही आणि समताही प्रस्थापित होणार नाही,"[१४] असा एक उपाय त्यांनी सांगितला आहे. या उपायाचे अधिक स्पष्टीकरण करताना ते म्हणतात, रोटीबंदी, भेटीबंदी, स्पर्शबंदी या सर्व बंदीच्या बेड्या एका बेटीबंदीमुळे उद्भवल्या आहेत. ती नष्ट केली की बाकीच्या

आपोआप नष्ट होतात. बेटीबंदी तोडणे हाच अस्पृश्यता निवारणाचा खरा मार्ग आहे. म्हणून जर अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर तिचे मूळ बेटीबंदीत आहे हे आपण ओळखले पाहिजे.[१५] कारण जोपर्यंत वर्णव्यवस्था कायम आहे तोपर्यंत ब्राम्हण वर्गाचे श्रेष्ठत्व कायम राहणार आहे. यास्तव चातुर्वर्ण्यांतर्गत असलेला भेदभाव नष्ट झाल्याशिवाय हिन्दू समाजाचा उध्दार व राष्ट्राचा उत्कर्ष होणार नाही.

आंबेडकरांच्या मते, चातुर्वर्ण्यव्यवस्था ही लोक विग्रहकारी व्यवस्था आहे. तर एकवर्णी व्यवस्था ही लोकसंग्रहकारी व्यवस्था आहे. हे दिसत असताना लोकविग्रहकारी व्यवस्था टिकवून ठेवण्याचा आग्रह धरणे यात हिन्दू समाजाचे अहित आहे. हे सर्व टाळायचे असेल तर चातुर्वर्ण्यांतर्गत असलेल्या विषमतेचेही उच्चाटन होईल. म्हणजेच हिन्दू समाज जर समर्थ बनवायचा असेल तर चातुर्वर्ण्य व असमानता यांचा समूळ उच्छेद करून हिन्दू समाजाची रचना एकवर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या पायावर केली पाहिजे आणि जातिप्रथा निर्मूलनाचा मार्ग हा हिन्दू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही. म्हणून आंबेडकर म्हणतात की, व्यापक दृष्टीने विचार करता हे कार्य जितके स्वहिताचे आहे तितकेच ते राष्ट्रहिताचेही आहे.[१६]

जातिप्रथा निर्मूलनाचे कार्य लगेच हाती घेतले पाहिजे, अशी त्यांची आग्रही भूमिका होती. ते म्हणतात, अस्पृश्यता मानणे हे एवढे मोठे पाप आहे की तिचे उच्चाटन या घडीस झालेच पाहिजे. कारण अन्यायाला परंपरा आहे ही परंपरा हजारो वर्षापासून चालू आहे. पुढेही चालू राहिल. म्हणूनच ती लवकर नष्ट केली पाहिजे. यासाठी ते म्हणतात, जातिप्रथेचे विलंब न लावता उच्चाटन करायचे असेल तर आम्ही सुचविलेल्या उपायांसारखे दुसरे उपाय सापडणे कठीण आहे. व्याख्याने देणे, मोठमोठया परिषदा भरविणे, ठराव पास करणे याने जातिभेदाचे निर्मूलन होणार नाही.

त्यासाठी समाजात जागृती केली पाहिजे. त्यांच्या मते, समाजात विचारशून्य व आचारशून्य असे दोन वर्ग असतात. विचारशून्य लोक अस्पृश्यता वाईट आहे हा विचारच करीत नाहीत तर आचारशून्य लोक अस्पृश्यता वाईट आहे हा विचार मान्य करतात. परंतु जातिवर्चस्वाच्या मोहाला बळी पडल्यामुळे त्यांच्या हातून विचाराप्रमाणे आचरण होत नाही. त्यासाठी सर्वप्रथम विचारशून्य लोकांना विचार करण्यास भाग पाडले पाहिजे.[१७] परंतु हे कार्य अतिशय अवघड आहे. असे त्यांना वाटते आणि जातिनिर्मूलन किंवा अस्पृश्यता निवारण करायचे असेल तर लोकजागृती, मतपरिवर्तन यासारख्या मार्गांचा अवलंब केला पाहिजे.

समाजातील कर्मठ, सनातनी व स्वमताविषयी आग्रही असणाऱ्या वर्गाच्या मतांमध्ये सहजासहजी बदल होणार नाही. हा बदल करण्यासाठी प्रभावी मार्गाची आवश्यकता त्यांनी सांगितली आहे. ते म्हणतात, जागृती व मतपरिवर्तन करण्याचा महत्त्वाचा कार्यभाग प्रतिकार योगाशिवाय अन्य अल्पस्वल्प उपायांनी होणार नाही. प्रतिकाराचा मार्ग बिकट असला तरी अन्यायाविरुद्ध लढण्याचा तोच योग्य मार्ग आहे.[१८] प्रतिकाराप्रमाणेच बहिष्कार व सत्याग्रह हे दोन मार्गही त्यांनी सांगितले आहेत.

आंबेडकर म्हणतात की, बहिष्काराचा मार्ग सवर्णांना कधीच रुचणार नाही. परंतु अस्पृश्य वर्गाला त्याच्या राग, लोभाची पर्वा नाही. अस्पृश्यता या वर्गाच्या उत्कर्षाच्या आड येते. याचा प्रत्यक्ष अनुभव हिन्दू समाजाच्या नजरेस आणून देण्यास बहिष्कार योगासारखे दुसरे साधन अस्पृश्य वर्गाजवळ नाही. यादृष्टीने हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. सत्याग्रहाचा मार्ग समान हक्कांच्या मागणीसाठी योग्य आहे. अस्पृश्यांचे समान हक्क मिळविण्याचा जो आग्रह तो सत्याग्रह. या मार्गामुळे अस्पृश्य

कांच्या मनात आपल्या हक्काविषयी आकांक्षा निर्माण होईल. थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी जातिभेद व अस्पृश्यता निर्मूलनाच्यादृष्टीने प्रतिकार, बहिष्कार व सत्याग्रह या मार्गांचा अवलंब केला पाहिजे असे सांगितले आहे.

म्हणजेच आंबेडकर जातिप्रथा निवारण व अस्पृश्यतेचे निवारण या कार्यात सवर्ण तसेच अस्पृश्य कांलाही सहभागी करुन घेतात. दोन्ही कांच्या एकत्रित प्रयत्नांतून जातिभेदाचा उच्छेद होऊ शकेल, असे त्यांना वाटते.

सावरकर आणि आंबेडकर यांच्या जातिनिर्मूलनविषयक उपयांचा तुलनात्मक अभ्यास:

बॅ. सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्या जातिनिर्मूलनविषयक विचारांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, त्यांचे जातिनिर्मूलनाविषयीच्या बऱ्याच मुद्यांबाबत एकमत आहे. तरी त्याच्या निर्मूलनासाठी दोघांनी सुचविलेले मार्ग व उपाय यात काही बाबतीत फरक आहे. म्हणजेच जातिनिर्मूलन होऊन हिन्दू समाज समर्थ व संघटित झाला पाहिजे. याबाबतीत त्यांच्यात एकमत होते. परंतु त्यादृष्टीने दोघांनी सांगितलेल्या मार्गात बरीच भिन्नता आहे.

यासंदर्भात सावरकर व आंबेडकर या दोघांनी जातिप्रथा हिन्दू समाजाच्यादृष्टीने अनिष्ट असून तिने खालच्या जातींवर सतत अन्याय केला आहे, हे मान्य केले आहे. त्यामुळे तिचे उच्चाटन करणे आवश्यक आहे, हे ही त्यांनी मान्य केले आहे. परंतु याबाबतीत सावरकरांनी भूमिका व जातिनिर्मूलनाची उपाययोजना डॉ. आंबेडकरांपेक्षा भिन्न आहे. सावरकरांनी जातिनिर्मूलनासाठी वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी

यासारख्या "सप्तबंदी"च्या बेड्या तोडण्याचा मार्ग सांगितला आहे. सावरकरांच्या मते, हिन्दू राष्ट्राच्या सामर्थ्य व संघटनाच्या आड येणाऱ्या या सप्तदोषांवर परिणामकारक उपाय म्हणजे सप्तबंधने तोडणे हा होय.

अशी जातिबंधने तोडण्यासाठी त्यांनी आंतरजातीय सहभोजने, मेळावे, समारंभ, यासारख्या कार्यक्रमांवर विशेष भर दिला. विद्याग्रहणाचा सर्वांना समान हक्क असला पाहिजे, असा आग्रह धरला. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवून देण्यासाठी सत्याग्रह केला. अखिल हिन्दूंसाठी पतितपावन मंदिराची स्थापना केली. व्यवसाय बंदी तोडण्यासाठी व्यवसाय हे जातींच्या मानीव योग्यायोग्यतेवर न ठरता इच्छा व गुण यानुसार ठरावेत, असा प्रसार केला. बेटीबंदी मोडण्यासाठी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. तसेच आंतरजातीय सहभोजने घडवून आणली व या उपक्रमाद्वारे रोटीबंदीचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला.

तर डॉ. आंबेडकरांनी देखील वर्णाश्रम धर्माचा मुख्य आधार असलेल्या रोटीबंदी, भेटीबंदी, बेटीबंदी या बेड्या तोडण्याचा मार्ग सांगितला आहे. म्हणजेच या मार्गाबाबत बॅ. सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्यात एकमत आहे. तरीही डॉ. आंबेडकरांनी बेटीबंदी मोडून सर्व जातींमध्ये मुक्त बेटी-व्यवहार घडवून आणला पाहिजे. या मार्गावर विशेष भर दिला आहे. ते म्हणतात, "नुसती रोटीबंदी गेली म्हणजे अस्पृश्यता गेली असे मानण्याचा मूर्खपणा करू नका. बेटीबंदीचे उच्चाटन करणे हाच खरा समता प्रस्थापित करण्याचा मार्ग आहे."[१३]

डॉ. आंबेडकरांनी व सावरकरांनी आपापल्या जातिप्रथेविषयी असलेल्या वैचारिक भूमिकेला अनुसरून तिच्या निर्मूलनाचे मार्ग सांगितले आहेत. त्यादृष्टीने विचार करता डॉ. आंबेडकरांचे या संदर्भातील विचार अधिक

मूलगामी आहेत. ते म्हणतात, जातिभेद मोडून समाजात समता प्रस्थापित केली पाहिजे आणि जर जन्मजात जातिभेद मोडायचा असेल तर हिन्दू समाजाची मानसिक व सामाजिक घडण बदलली पाहिजे. मानसिक घडण बदलायची म्हणजे लोकांच्या जातिप्रथेविषयीच्या प्रवृत्ती, सवयी, समज यात बदल करायचा आणि सामाजिक घडण बदलायची म्हणजे जन्मधिष्ठीत जाती व वर्णप्रथा नष्ट करून स्वातंत्र्य, समता व बंधुता या व्यापक तत्त्वत्रयीवर समाजाची रचना करणे होय. असा जातिनिर्मूलनाचा व समताधिष्ठीत समाजरचनेचा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला आहे.

डॉ. आंबेडकरांनी हिन्दू समाजाची व्यवस्था चातुर्वर्ण्य पध्दतीनुसार लावण्याच्या कल्पनेला तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यांनी कोणत्याही स्वरूपातील वर्णपध्दती अमान्य केली आहे. कारण त्यांच्या मते, एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावर वर्चस्व असणे यातच चातुर्वर्ण्य पध्दतीचे खरे मर्म आहे.[20] यासाठी सर्व जातिभेद नष्ट करून समाज एकवर्णी केला पाहिजे आणि अशा जातिविरहीत समाजाचे स्वातंत्र्य, समता व बंधुता हे मुख्य अधिष्ठान असले पाहिजे.

मात्र सावरकरांनी गुण कर्मनिष्ठ चातुर्वर्ण्यपध्दतीच्या चौकटीत राहून जात्युच्छेदनाचा विचार मांडला आहे. सबळ व संघटित हिन्दू राष्ट्राच्या निर्मितीच्या मार्गातील समस्या यादृष्टीने ते जातिप्रथेचा विचार करतात. त्यामुळे ही जातिप्रथा कितपत हिंदू राष्ट्राला घातक आहे तिथपर्यंतच तिच्यात बदल करण्याचा विचार ते मांडतात. म्हणूनच जाती व वर्णव्यवस्था समूळ नष्ट करण्याचा व जातिविरहीत अशा एकवर्णी समाजाचा विचार त्यांनी कधीच मांडला नाही. ज्या जन्मजात वर्णव्यवस्थेतून विकृत जातिसंस्था विकसित झाली त्या वर्णव्यवस्थेऐवजी त्यांनी गुण व कर्म यावर आधारलेल्या वर्णव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचा विचार मांडला आहे.

हे सर्व सामाजिक, धार्मिक तसेच मानसिक परिवर्तन करायचे असेल तर हिंदू समाजाच्या प्राचीन धर्मग्रंथांचे कठोर परिक्षण केले पाहिजे. अशी आवश्यकता दोघांनाही वाटते. मात्र ज्या धर्मग्रंथांनी जातिप्रथेला मान्यता दिली, तिच्या विषम व अन्यायकारक स्वरुपाचे समर्थन केले त्या धर्म ग्रंथांची चिकित्सा करुन त्यातील जे उपयुक्त व योग्य आहे तेच स्वीकारावे तसेच जे विज्ञानाच्या कसोटीवर उतरेल तेच ग्राह्य मानावे असे सावरकरांना वाटते. परंतु डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथांना, शब्दप्रामाण्याला कठोर विरोध करताना बुध्दीवाद व शास्त्रीयदृष्टीकोनातून त्याचे कालबाह्य स्वरुप स्पष्ट केले आहे. त्यांनी मनुस्मृतीसारख्या हिंदू धर्म ग्रंथांचे दहन करुन धर्मग्रंथांचे पावित्र्य व शास्त्रवचनांचे प्रामाण्य पूर्णत: नाकारले. धर्मश्रध्दा, आग्रह, दुराग्रह आणि ग्रंथप्रामाण्य ह्यांच्या मानसिक गुलामगिरीत जखडून राहिलेल्या हिंदू समाजाची धर्मदास्यातून मुक्तता करावी व त्यांना विवेकवादाच्या वाटेवर आणावे हा डॉ. आंबेडकरांच्या धर्मचिकित्सेमागील हेतू होता.[21] तसेच त्यांनी हिंदूधर्मग्रंथाप्रमाणेच विषम समाजव्यवस्था, अन्यायकारक वर्ण पध्दती यांना विरोध करुन अस्पृश्य वर्गाच्या हक्कप्राप्तीसाठी अखंड लढा दिला.

डॉ. आंबेडकरांनी जातिभेद निर्मूलन व अस्पृश्यता निवारण ही सवर्णापेक्षा अस्पृश्यांची मोठी जबाबदारी आहे, असे मानले आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी शुध्दी व संघटन हे दोन मार्ग आहेत असे त्यांनी सांगितले. याविषयी आंबेडकरांचे मत होते की "हिंदू लोकांना आजच्याकाळी शुध्दीपेक्षा संघटनेची विशेष जरुरी आहे."[22] यादृष्टीने ते संघटना कार्यावर विशेष भर देतात. याबाबतीत ते म्हणतात, " या दोन कार्यापैकी आमच्या मते, संघटना हेच जास्त महत्त्वाचे कार्य आहे. आमचे असे मत आहे की, हिंदूंनी आपले संघटन केले तर शुध्दीची काही आवश्यकता उद्‌भवणार नाही."[23]

थोडक्यात सावरकर व आंबेडकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार त्यांच्या वैचारिक भूमिकेतील फरक दाखवतात. आपले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी जे उपाय किंवा मार्ग सांगितले आहेत त्या मार्गाने जातिनिर्मूलन करण्याचा प्रयत्न दोघांनी आपापल्या पध्दतीने केला आहे. यादृष्टीने दोघांचे जातिनिर्मूलन विषयक विचार व कार्य वैशिष्ठ्यपूर्ण आहे.

डॉ. आंबेडकर व बॅ. सावरकर हे दोघेही जातिनिर्मूलनाचे वा जात्युच्छेदाचे पक्षपाती होते. पण या प्रकरणी त्या दोघांची उद्दिष्टये वेग-वेगळी होती. सावरकरांना जातिनिर्मूलन व जातीचा उच्छेद हिंदुराष्ट्र बळकट करण्यासाठी करावयाचा होता. जातींमुळे हिंदू शतश: विभाजित झाले. त्यांच्यात फाटाफूट झाली व मुसलमान हल्लेखोरांचे फावले. भारतीय राजकारणात मुसलमान शिरजोरी करतात. कारण हिंदू जाती-जातीत विभागले आहेत. म्हणून हिंदूचे संघटन केले पाहिजे व या संघटनेच्या आड जातिसंस्था येते म्हणून जातिसंस्थेचे निर्मूलन केले पाहिजे, असे सावरकरांचे मत होते. त्यांची जात्युच्छेदाची चळवळ ही शेवटी त्यांच्या हिंदुत्वाच्या राजकारणास जोडलेली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे हिंदुत्वाचे राजकारण मान्य नव्हते. "राजकारणातील भिक्षुकगिरी" म्हणून त्यांनी हिंदु महासभेची संभावना केली होती. बाबासाहेबांच्या राजकारणात जातिनिर्मूलनाला महत्त्वाचे स्थान होते. कारण त्यांचे असे मत होते की, भारतातील उच्चवर्णीयांनी आपले सामाजिक आणि राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जातिसंस्थेचा वापर केला. धर्माचा उपयोग करुन त्यांनी आपल्या वर्चस्वाला सामाजिक मान्यता मिळविली. त्यामुळे त्यांचा जातिनिर्मूलनाच्या राजकारणाचा मुख्य उद्देश प्रस्थापित समाजव्यवस्था बदलणे हा होता. त्यासाठी समाजातील

वेगवेगळ्या वर्गांना, जातींना गटांना सत्तेत योग्य वाटा मिळाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. या सर्व राजकारणाचा उद्देश समाजाचे जास्तीतजास्त लोकशाहीकरण करून अस्पृश्यांचा उध्दार करणे हे होते.

डॉ. आंबेडकर हे प्रागतिक विचारांचे होते. धर्माच्या आधारावर राष्ट्राची उभारणी करण्यास त्यांचा सक्त विरोध होता. भारतात लोकांचे प्रजासत्ताक गणराज्य त्यांना स्थापन करावयाचे होते. समता, स्वातंत्र्य आणि न्याय या तत्त्वत्रयीवर आधारलेला समाज त्यांना येथे उभा करावयाचा होता. जात व धर्म हे त्यामार्गातील अडथळे आहेत असे त्यांचे मत होते. हिंदूंचा धर्म हा राष्ट्रैक्यास व समाजैक्यास घातक आहे. त्यामुळे त्याआधारावर राष्ट्र उभारणी करता येणार नाही असे त्यांचे मत होते. याचाच अर्थ असा की समाजाच्या मूलभूत ध्येयांबाबतच त्यादोघांचे मतभेद होते.

.........

## प्रकरण चौथे

## डॉ. आंबेडकर व बॅ. सावरकर यांच्या जातिनिर्मूलन विषयक विचारांचा तुलनात्मक अभ्यास

१. पळशीकर वसंत - सूर्यबिंबाचा शोध (सं.) विलास खोले पृ.क्र.२६

२. उक्त पृ.क्र. २६

३. उक्त पृ.क्र. १८०

४. मून वसंत (अनु.) जातिसंस्थेचे उच्चाटन पृ.क्र. १०

५. कसबे रावसाहेब - आंबेडकर आणि मार्क्स पृ.क्र. १२५

६. खैरमोडे चां.भ. - डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड.३ पृ.क्र. १६३

७. उक्त पृ.क्र. १७२

८. पळशीकर वसंत - सूर्यबिंबाचा शोध (सं.) विलास खोले. पृ.क्र. ८६

९. उक्त पृ.क्र. ८८

१०. उक्त पृ.क्र. ८८

११. उक्त पृ.क्र. १००

१२. मून वसंत (अनु.) जातिसंस्थेचे उच्चाटन — पृ.क्र. ६९

१३. खैरमोडे चां.भ. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र खंड-३. — पृ.क्र. २३१

१४. उक्त — पृ.क्र. १६६

१५. उक्त — पृ.क्र. १६९

१६. उक्त — पृ.क्र. १७१

१७. उक्त — पृ.क्र. ९२

१८. उक्त — पृ.क्र. ९८

१९. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.क्र. १०४

२०. उक्त — पृ.क्र. ११४

२१. फडके भालचंद्र - आंबेडकर व दलित साहित्य — पृ.क्र. २३

२२. कीर धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — पृ.क्र. ८३

२३. उक्त — पृ.क्र. ८४


......